TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

# घायाळ

य. दि. पेण्ढरकर

M 33
7 97G

किंमत २ रुपये

UNIVERSAL LIBRARY
OU_192883
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83/Z97G Accession No. M 4714

Author फ्लाउग, स्टीफान.

Title पाषाण 1866 sake

This book should be returned on or before the date last marked below

# घायाळ

ग. दि. पेण्ढरकर

किंमत २ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पेठ, पुणे २

संचालक
भ. त्र्यं. देशमुख,
बी. ए., एल्एल्. बी.

क्रमांक ६३
८ जून १९४४

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड | १॥। |
| २ | घरट्याबाहेर | १॥। |
| ३ | पहिलें प्रेम (आ २ री) | ३ |
| ४ | जळलेला मोहर | ३ |
| ५ | क्रौंचवध | ४ |
| ६ | सायंकाल (आ २ री.) | २॥ |
| ७ | अविनाश | १॥। |
| ८ | मदाकिनी | १॥। |
| ९ | सहा भाषणें | २ |
| १० | कलिका | २। |
| ११ | स्त्री आणि पुरुष | २ |
| १२ | पाढरे ढग | ४। |
| १३ | फुले आणि काटे | २। |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | | |
|---|---|---|
| १ | अवशेष | २ |
| २ | नागकन्या | २ |
| ३ | माझी नभोवाणी | २ |
| ४ | नवे ससार (जप्त) | ४ |
| ५ | चदनवाडी | ६॥ |
| ६ | व्यक्तिरेखा | २। |

## ना. धों. ताम्हनकर

| | | |
|---|---|---|
| १ | तात्या भा. १ ला | २॥ |
| २ | तात्या भा. २ रा | ३ |
| ३ | निवाडे भा १ ला | २॥ |
| ४ | चकमकी | १॥ |
| ५ | बच्चा नवरा | १॥ |
| ६ | अनेक आशीर्वाद | ३॥ |
| ७ | दाजी भा १ ला | ३॥ |

## चिं. वि. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| २ | नवें भारूड | २ |
| ३ | स्टेशनमास्तर | २ |

## साने गुरुजी

| | | |
|---|---|---|
| १ | पुनर्जन्म (आ. २ री) | ३ |
| २ | आस्तिक | २॥ |
| ३ | सोन्या मारुति (आ २री) | २ |

## दत्तु बांदेकर

| | | |
|---|---|---|
| १ | सख्याहरी | १॥। |
| २ | नवी आघाडी | १॥ |
| ३ | तू आणि मी | २। |

## शकुंतला परांजपे

| | | |
|---|---|---|
| १ | भिलिणीची बोरें | ३ |

## द. र. कवठेकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपुरा डाव | ३ |
| २ | रेशमाच्या गाठी | ३ |

## वा. म. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | स्मृति–लहरी | २ |
| २ | विचार–लहरी | २। |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

### पु. य. देशपांडे

१ नवें जग ? २॥

### भाई बेंक

१ रॉयचरित्र १॥

### प. ले. वि. स. खांडेकर

१ काव्यज्योति १

### आनंदीबाई जयवंत

१ पारख्या २

### लक्ष्मण० सरदेसाई

१ ढासळलेले बुरूज २

### प्रो. वि. ह. कुलकर्णी

१ व्यक्तिचित्रें २॥

### ना. ह. आपटे

१ फसगत १॥

### प्र. के. अत्रे

१ साखरपुडा १॥

२ ललित वाङ्मय ३॥

### कृष्णाबाई मोटे

१ मीनाक्षीचें जीवन २।

### र. गो. सरदेसाई

१ चलती नाणी २

### रा. श्री. जोग

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

### ना. म. पटवर्धन

१ हितपत्रे ३

### वि. वि. बोकील

१ बेबीची बहीण ३

### सत्यग्राही

१ ग्रह आणि तारे ४॥

### अनंत काणेकर

१ धुक्यातून लाल ताऱ्याकडे ३

२ पिकली पानें ( दु. आ. ) १॥

### काकासाहेब कालेलकर

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १॥

### य. दि. पेण्ढरकर

१ प्रापंचिक पत्रे ३

२ घायाळ २

### वि. म. भुस्कुटे

१ स्टॅलिन ३॥

### कमलाबाई टिळक

१ आकाशगंगा २॥

### रामतनय

१ साखरगोटी ५

# आगामी प्रकाशनें

## वि स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ कालची स्वप्नें
१० चार भिती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यससार
१३ वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय )
१४ पहिली लाट
१५ कल्पलता
१६ हिरवा चाफा ( दु आ )
१७ दोन ध्रुव ,,
१८ सुवर्णकण

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ती उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका

## द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ आभाळाची सावली

## ना. धों. ताम्हनकर

१ निवाडे भा २ रा
२ गुजाताई
३ शेजारी

## प्र. के. अत्रे

१ 'मी' कसा झालो

## कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रात
३ मवाली

## काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चि. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ नटश्रेष्ठ

## दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब

## कुसुमावतीबाई देशपांडे

१ मोळी

## शकुंतला परांजपे

१ चादर्णी

## ना. ह. आपटे

१ साजणी

## ना. म. पटवर्धन

१ वा म जोशीचरित्र
१ ! **आचार्य भागवत**
१ ! **क्षमाबाई राव**

# कवि यशवन्त यांची साहित्य-सम्पदा

## काव्य

*मित्र-प्रेम-रहस्य*

मित्रनिधनावरील विलापिका
**किं. ४ आणे.**

*तुटलेला तारा*

लो. टिळक यांचे निधनावरील शोक-गीत. **किं. २ आणे.**

*यशवन्ती*

प्राथमिक स्फुटकवितासंग्रह
**किं. १० आणे.**

*यशोधन*

'इन्दुकला' आणि इतर उत्कृष्ट कविता याचा सग्रह [ चौथी आ ]
**कि २ रु**

*भावमन्थन*

एक मुनीतमाला आणि निवडक भाव-गीते **किं. ८ आणे.**

*बन्दीशाळा*

बालगुन्हेगाराच्या करुण स्थितीवरील खण्डकाव्य [ दुसरी आवृत्ति ]
**किं. १ रु.**

*जय मङ्गला*

विविध-भावगीतात्मक हृदयंगम प्रेम-कथा. **किं. १ रु.**

*यशोगन्ध*

यशोधनासारखाच सरस व भावमधुर कवितासंग्रह **किं. १ रु**

*यशोनिधि*

यशोधन व यशोगंध याचे तुल्यगुणी भावण्ड **किं १। रु**

*काव्यकिरीट*

बडोदा-नरेश श्रीमन प्रतापसिह महाराज गायकवाड याचे राज्यारोहण-विषयक, राजनीतिगर्भ खण्डकाव्य
**किं १॥ रु**

*यशोगिरी*

धन-गंध-निधीचे विकासशील व अनुभवसमृद्ध स्वरूप दाखविणारा कवितासग्रह **किं. १॥ रु.**

## बालवाङ्मय

*मोतीबाग*

चित्रकार दलाल याच्या कुंचलीने मोहरलेला, बाल गाण्याचा वैभवशाली संग्रह **कि १० आणे**

*दरोडेखोर ? छे, देवदूत*

शिक्षणशास्त्रज्ञानी प्रशंसिलेल्या दोन गोष्टी. **किं ६ आणे.**

*भगवी गीता*

वरीलप्रमाणेच बालमनोविनोदनार्थ दोन रम्य गोष्टी **किं ५ आणे**

---

*प्रापंचिक पत्रे* [ गद्य व पद्य ]

ससाराच्या वास्तवतेचे जिव्हाळयाने व काव्यात्मतेने केलेले रम्योत्कट चित्रण. **किं. ३ रु.**

*घायाळ* **किं. २ रु.**

# अर्पण पत्रिका

*ती र्थ स्व रू प*

श्री. ताई अध्यापक

आणि

श्री. ताई भट

यांस—

## परिचय

तिचे अखेरचे पत्र ( *Letter from an Unknown Woman* ) आणि अघोर अहंकार ( *Amok* ) ह्या दोन लघु कादंबऱ्यांनी स्टीफान झ्वाइग ( *Stefan Zweig* ) ह्या महान् साहित्यिकाची ओळख मराठी वाचकाना झाली असून, तिचे श्रेय प्रा. ना म पटवर्धन ह्यांना आहे. " वेडापिसा " ह्या नांवानेंही *Amok* मराठीत अवतरला आहे, व त्यासाठी प्रा. न. का घारपुरे ह्यानीं परिश्रम घेतले होते. झ्वाइगच्या एक–दोन लघुकथाही मराठीत आल्याचे आठवतें. ज्याना हे काहीच माहीत नाही त्यांनाही झ्वाइगच्या अलौकिकतेची साक्ष पटविण्यासाठी आणखीही एक पुरावा असा देतां येईल की, मराठीत आज अघाडीला असलेले कादंबरीकार श्री. खाण्डेकर यानीं आपली " क्रौंचवध " ही कादंबरी ( अर्न्स्ट टॉलरच्या बरोबरच ) स्टीफान झ्वाइगला समर्पण करून, त्याच्या थोरवीपुढे मान

तुकवली आहे. 'आपला आवडता ग्रंथकार' म्हणून भाषणांत त्याचा उल्लेखही केला आहे.

टॉलरची ललित लेखणी मानवतेच्या पोटतिडीकीनें प्रस्फुरित झाली असून जुलमी राजकारणाविरुद्ध तिचें पातें असिधारेप्रमाणे तळपत होतें. गेल्या महायुद्धांत जर्मनीच्या मायप्रेमानें लढणाऱ्या ह्या शूर ज्यू सैनिकाला नाझी राजवटींत "बाबांनो, रोमरोमीं *I was a German*" असा आंतडीं पिळवटून टाहो फोडावा लागला; तरी, ज्यू–विद्वेषानें बेफाम झालेल्या नाझी राज्ययंत्राला विवेकी कान नसल्यामुळें, त्याचा मुळींच उपयोग झाला नाहीं. मानवी स्वातंत्र्याच्या ह्या निस्सीम उपासकाला खडतर तुरुंगवास सोसावा लागला आणि शेवटीं प्राणभयानें परागंदा व्हावे लागले.

प्रत्यक्ष राजकारणांत स्टीफान झ्वाइगनें भाग घेतला होता कीं नाही, माहीत नाहीं. "स्वतःच्या समाधानासाठीच मी लिहितो. माझ्या मनांत जे विचार घोळतात तेच लेखनांत उतरविण्याचा कसोशीनें यत्न करतो. मी एक समाधानी वृत्तीचा लेखक आहे." असे त्यानें एका मुलाखतीत सांगितलें आहे. तथापि, नाझी हुकुमशाहीचाच हा आणखी एक बळी होय. प्रच्छन्न वा अप्रच्छन्न राजकारणाशी ह्या साहित्यनिर्मात्याच्या लेखणीला कांही कर्तव्य नव्हतें. मनोभावना आणि गूढ प्रेरणा ह्यांनीं अखिल मानवी जीवितांत निर्मिलेल्या सुखदुःखांचा, नव्हे, दुःखांचाच अत्युत्कट सूर त्याच्या लेखणीतून निनादला. गेल्या महायुद्धानें जगावर ओढवलेलें संकट, राष्ट्रवादानें जगाला दिलेले भूकंपसदृश धक्के आणि जीवित–मूल्यांची झालेली भयंकर उलथापालथ ह्यानें जाणतेपणीं पाहिली व अनुभवली असल्यामुळें–त्या प्रलयानलांत हा होरपळून निघाला असल्यामुळें, सांप्रतचें जगड्व्याळ युद्ध जेव्हां भडकलें तेव्हां समग्र भूगोलाची आणि मानवी संस्कृतिविजयाची त्यांत राखरांगोळी होणार हें पाहून, कल्पनाचक्षूंना दिसणारें जगाचें भेसूर भवि-

तव्य न साहून, ह्या साहित्यस्रष्ट्यानें (ता. २३–२–१९४२ रोजीं) पत्नीसह आत्महत्या केली. खरे म्हणजे, *When a man is sixty-five death has already tapped him on the shoulder* हें जो स्वतः जाणतो तो त्या साठीच्याच घराला आला असतांना, "ढळला रे ढळला दिन सखया...लागले नेत्र रे पैलतिरीं" असे स्वाभाविकपणे उद्गार निघण्यासारखी वयोमर्यादा ज्यानें गांठली त्याला आत्महत्येची अवश्यकता होती कुठे? पण, तेव्हढाही धीर त्याला धरवला नाहीं,–मृत्यूची तेवढीही चालढकल त्याला साहवली नाहीं. तो कदाचित् अळम् टळम् करील म्हणून, हाच भेटायला धावून गेला! इतकी ह्याची अधीरता, इतका ह्याचा हळवे-पणा! नाझी राजवटीच्या कचाट्यांतून निसटून ब्राझील येथे यानें आपलें वसतिस्थान थाटले. तेथे आपल्याला आपल्या आयुष्याची पुनर्घटना करतां येईल, अशी त्याला उमेद होती. "माझीं पुस्तके इटालियन आणि जपानी इतकेच काय जगांतील सर्व भाषांत प्रसिद्ध झालीं आहेत. जेव्हा हिटलरच्या हाती सत्ता आली तेव्हां माझ्या पुस्तकांना त्याने जर्मनीत बंदी केली आहे. कदाचित पुढील आठवड्यात फ्रान्समध्ये बंदी होईल. फिनीश् आणि पोलिश भार्षेत प्रसिद्ध झालेल्या माझ्या ग्रंथांच्या आवृत्त्या आज कुठे आहेत? प्रत्येक आठवड्याला एक एक देश मी गमावून बसत आहे. तरीही जोपर्यंत माझी पुस्तके एका भाषेत प्रसिद्ध करण्याची संधि मिळत आहे तोपर्यंत धीर सोडण्याचे कारण नाहीं" असेंही त्यानें बोलून दाखवले होतें. परंतु हाही धीर टिकून राहिला नाहीं. अखेर "माझ्या मातृभाषेचा देश आणि नंतर सर्व युरोप, यांचा विनाश पाहिल्यावर वयाच्या साठाव्या वर्षी माझा उत्साह कायम राहणें शक्य नव्हतें. आणि म्हणूनच माझ्या जीविताचा शेवट कर-ण्याची वेळ आली आहे असें मला वाटतें. कारण मानव जातीचे आणि माझे स्वतःचें स्वातंत्र्य हेंच जगांतील सर्वांत मोठें धन होय या कल्पनेनें

एका विशिष्ट कार्याला मी माझें जीवित वाहून घेतलें होतें. तें कार्य पुढे करीत राहण्याची शक्यता मला दिसेना. " असें लिहून ठेवून ह्यानें आपल्या जीविताची परिसमाप्ति केली. ह्या अखेरच्या उद्गारांत त्याचें व्यक्तिमत्व जसे प्रगट होतें, त्याची पिंडप्रकृति जशी स्पष्ट होते तशींच त्याच्या वाङ्मय-निर्मितीचीं बीजेही डोकावतात. अशा ध्येयनिष्ठ भावनोत्कट साहित्यिकाचा वाङ्मयसम्भार अतिशय भावविवशतेनें थबथबलेला असावा असें सहज अनुमान काढतां येतें; आणि तसा तो असणें स्वाभाविकच आहे. सुरुवातीलाच ज्या दोन कथांचा उल्लेख केला आहे त्या ज्यांनीं वाचल्या असतील त्यांना हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

पंचविशीच्या आतच तीन कवितासंग्रह आणि एक कथासंग्रह ह्या वाङ्मयाचें कर्तृत्व झ्वाइगनें प्रगट केले. घिख्यात फ्रेंच कवि व्हेर्लेन (*Verlaine*) ह्याच्या निवडक कवितांचें भाषान्तर करून बॉएर्नफील्ड (*Bauernfeild*) हें विलोभनीय पारितोषकहि ह्याच वयोमर्यादेंत मिळविल्यामुळें त्याचें वाङ्मयीन चारित्र्य विशेष विश्रुत झाले. 'एका स्त्रीच्या जीवितांतील चोवीस तास' (*Twenty four hours in a woman's Life*) ही त्याची पहिली कादंबरी. गॉर्कीनें ह्या कादंबरीबद्दल "इतकें सखोल स्वभावचित्रण मी केव्हांच वाचलें नव्हतें" असे उद्गार काढले. झ्वाइगची चरित्रविषयक वाङ्मयनिर्मितीही अत्यत प्रभावसपन्न आहे. गॉर्कीनें दिलेले प्रशस्तिपत्र झ्वाइगविरचित चरित्रग्रंथांतील त्याचप्रमाणें कथा–कादंबऱ्यांतील सर्वच व्यक्तीच्या चित्रणाला सारखेच लागूं होईल.

झ्वाइगच्या लेखणीचा सारा भर, त्याला ज्या विशेष व्यक्ती आढळल्या त्यांचे मनोव्यापार विशद करण्यावर आहे. घडोमोडींची रहस्यमय ओढ त्याच्या लेखनांत फारशी नाहीं. पण व्यवहारांतल्या घडामोडीमागें काय मनोरचना असते आणि तिच्या व त्यांच्या योगानें व्यक्तिमात्राच्या जीवन-

प्रवाहाला कशी गती येते किंवा कलाटणी मिळते हे सूक्ष्मपणे दाखविण्यांत त्याचे सारे लेखनचातुर्य सामावले आहे–त्याचे सारे चित्रणकौशल्य बहरलें आहे.

मनोविश्लेषणात्मक कथालेखन मराठींत विकास पावत आहे. परंतु त्यांत झ्वाइग इतकी मानसशास्त्राच्या सूक्ष्म अभ्यासाची आणि निरीक्षणाची प्रचीति येणारे लिखाण क्वचित्. एकादी 'संज्ञा' हाती लागली कीं ती राबवण्याची तत्परता निराळी आणि त्या संज्ञेला खरोखरी पात्र होईल अशी नमुनेदार निर्मिती करण्याची महत्त्वाकांक्षा निराळी! ह्या 'महत्त्वाकांक्षे' ऐवजीं 'तत्परता'च लवकर मिरवूं लागते; आणि सामान्य वाचकांकडून संज्ञा-प्रशंसेचा सवंग मान मिळवूं शकते. पण संज्ञेचे सौभाग्यचिन्ह धारण करणाऱ्या त्या ललित कृतीत उभ्या केलेल्या विशिष्ट व्यक्तीचे मनोव्यापार व मनोविकार गृहित धरलेल्या परिस्थितीशी सुसंगत असण्यापेक्षां लेखकाच्या कुवतीशींच संगनमत करतात. अर्थात् त्या पात्राचा सूत्रधार त्याचे मन नसून लेखकाचे मन होतें; त्या पात्राचे व्यापार त्याच्या मनाच्या लगामी असण्याऐवजी लेखकाच्या इच्छेमात्रे होत असतात; तें पात्र त्याच्या मनाचे व दैवाचे भक्ष्य होण्याऐवजी लेखकाच्या हातचलाखीचे भक्ष्य बनतें. झ्वाइगच्या लेखनांत असा प्रकार आढळणार नाही. मराठीत आलेल्या उपरिनिर्दिष्ट कथांमधील ती स्वार्थनिरपेक्ष उदात्त प्रणयिनी घ्या, किंवा तो बेफाम डॉक्टर घ्या, किंवा (अन्यत्र–प्रसिद्ध) आंधळा झालेला चित्रसंग्राहक घ्या—आपापल्या मनोधर्माच्या आवर्तात त्या त्या व्यक्ति भ्रमत आहेत असें दिसतें. खेळाडूनें आकाशात वावड्या सोडून देऊन त्यांचे दोरे मात्र आपल्याच हातांत धरून ठेवावेत त्याप्रमाणे लेखकानें त्यांचें सूत्रधारकत्व आपल्याकडे ठेवावयाचे नसतें. कागदाची कणिंग करून, तिच्या तोंडाला–मधोमध–भला थोरला बोळा पेटवून, अंतराळांत सोडून दिलेल्या धूम्रगति

आकाशदिव्याप्रमाणे त्या व्यक्ति आंतरिक प्रेरणेनें आणि वातावरणाच्या हेलकाव्यानें तरंगत राहाव्यात. त्यांचें भवितव्य त्यांचे शरीरधर्म आणि मनोव्यापार ह्यांच्या आधीन असावें. *A Failing Heart* ही छोटी कादंबरी अशा लिखाणाचा एक उत्कृष्ट नमुना असल्यामुळें निव्वळ मराठी वाचकांना त्याचा परिचय करून देण्यासाठीं हा " घायाळ " पुढें करण्यांत येत आहे.

ह्या ' घायाळ ' गृहस्थ एतद्देशीय नाहीं एवढें लक्षांत घेतल्यावर त्याचें नांव, गृह्यसंस्कार, भाषा, रीतरिवाज, स्थलविशेष वगैरे बाबतीत आढळून येणाऱ्या किरकोळ विसंगतीकडे वाचक काणाडोळा करूं शकतील. मुळांतील नांवेंच कायम ठेवण्यांत स्वारस्य आहे असें नाहीं, अपरिचित नांवें वाचतांना अडखळायला होतें, अ-ब-क सारख्या रुक्ष गणिती नांवांपेक्षां जवळीक निर्माण व्हायला परिचित नांवें मराठी वाचकांना बरीं वाटतील, अशी कल्पना आहे. हा ' घायाळ ' गृहस्थ विदेशीय व्यापारी आहे आणि त्याची बायको आणि कन्या एवढाच त्याचा परिमित परिवार आहे. पण त्याच्या संसारांत त्याच्या वाटणीला जें वैफल्य आले, त्याचा जो भ्रमनिरास झाला तो खरा सामर्थ्याचा गाभा असून तो जागतिक स्वरूपाचा असल्यामुळें त्याला हात घालण्याचे धारिष्ट केलें आहे.

ह्या गोष्टींतील नायक एक सर्वसामान्य व्यक्ति आहे; आणि त्याची ही कथा म्हणजे एक प्रपंचकथा आहे. मनुष्याच्या जीवनाला, आकांक्षांना केवळ लौकिकच बैठक असत नाही. आपल्या जीवितयात्रेंत तो जी दौड मारीत असतो तिला भावनात्मकतेंतून गती मिळत असते. त्याच्या व्याप-आटोपांना भावनात्मकतेची संजीवनी मिळते. विशिष्ट भावनेच्या भरीं भरून तो आपला मार्ग कापीत चाललेला असतो. आणि त्या मार्गांत असतांना त्याच्या कल्पनेंतील भ्रामकतेच्या झापडी कांहीं कारणांनीं—कांहीं दुर्दैवी घटनांनीं—दूर झाल्या म्हणजे जें नैराश्य त्याच्या वाटणीस येतें तें हृदयविदारक असतें.

नियतीचा अदृश्य हात कसा नि किती निष्ठुर असतो तो सिद्धान्त प्रारंभींच सांगून त्याचा आविष्कार ह्या गोष्टीत केला आहे.

कुटुंबाच्या योगक्षेमासाठीं, बायकापोरांच्या सुखसोयींसाठीं प्रत्येक कुटुंबांतील कर्ता कमीजास्त प्रमाणांत झटतच असतो,—तें त्याचें कर्तव्यच असतें. पण त्या झटण्याला अगदींच एकांगीपणा असला, त्या गृहस्थाच्या आयुष्याला ' कुटुंब ' हें एकच श्रेय नि प्रेय असले, त्या पलीकडे दृष्टीला क्षितिज नसले, सगळ्या पराक्रमाची प्रेरणा ' कुटुंबियांची धन करणें ' एवढीच असली म्हणजे तें जीवित, गुरुत्वाकर्षणाचा मध्यबिंदु पायांबाहेर झुकलेल्या मनोऱ्याप्रमाणे, कोसळून पार रसातळाला जायला चुटकीचा देखील अवधी लागत नाहीं.

कन्या धन परक्याचे ! हें जाणणारा बाप त्या धनांत नैसर्गिक चांचल्य प्रगट व्हायच्यापूर्वीच, म्हणजे कन्या वयांत येण्याच्यापूर्वीच, रीतसर दुसऱ्याच्या पदरांत तिची बोळवण करण्याच्या तयारीला लागतो. पण त्या तयारीला लागण्याइतकी बापाला जाग आली नाही तरी ' धन ' स्वभावधर्माला पारखे कसें होईल ? वयाबरोबर चांचल्य जागृत होणे हा निसर्गाचा नियम आहे आणि निसर्ग स्व - तंत्र असतो. नैसर्गिक प्रेरणेनें कन्येचें पाऊल चोरटेपणानें वाकडे पडलें तर ? तर आकांडतांडव न करतां, सामोपचारानें तें सावरून घेतले पाहिजे, आलें अंगावर तर घेतलें शिंगावर अशा वृत्तीनें त्या परिस्थितीला तोंड दिलें पाहिजे, " शिक्का मोर्तबा " नें ती आडवाट शक्य तर राजरस्त्याला आणून मिळविली पाहिजे. पण हें करायला, त्या दृष्टीनें पाहणारा, सारासार विवेक करणारा, व्यवहारचतुर कुटुंबकर्ता हवा !

दुष्यन्त ( कीं त्याच्या रूपानें पुष्पधन्वा ? ) जेव्हां शरसंधान करीत तपोवनांत शिरला तेव्हां शकुंतला प्रणयविवश होऊन त्याच्या अंकित झाली. पण पश्चात् जेव्हां कण्वाला हा प्रकार कळला तेव्हां त्यानें आपल्या तपो-

बलानें त्या शकुंतलेला दग्ध करून टाकली नाहीं किंवा दुष्यन्तावर शापाची आग पाखडली नाहीं. उपवर शकुंतलेला अनुरूप वर शोधण्याची त्याला कल्पना सुचली होती कीं नाहीं, त्यानें तसें कांहीं स्थलसंशोधन सुरू केलें होतें कीं नाहीं, हें ठावे नाहीं. पण निसर्गाच्या प्रभावानें संमूढ झालेल्या शकुंतलेनें, त्याच्या अनुपस्थितीत, स्वयंवर उरकून घेतलें म्हणून त्यानें कुटींतील होमकुंडांतली राख आपल्या डोक्यांत घालून घेतली नाहीं किंवा तिच्या डोक्यांत घातली नाहीं. तो मुनी — अर्थातच त्याच्या जीविताचें उद्दिष्ट पारलौकिक सद्गति हे होतें. शकुंतलेवर त्याचा जीव नव्हता असें नाहीं; पण तिच्यावरील ममत्वामुळें तो अंध झालेला नव्हता. तिच्यावरील त्याचें ममत्व इतकें स्वार्थनिरपेक्ष होतें की तिनें केलें ' तें चूक केलें ' असें न म्हणतां, तेंच करणे मान्य करून घेऊन, तिला तिनें पत्कर-लेल्या वाटेला लावायला तो राजीखुषीनें ( व तिच्या कल्याणबुद्धीनेंच ) प्रवृत्त झाला.

आणि चालू समाजस्थितीत, आपण आपल्या आंवती – भोवती पाहिलें तरी आजही आपणाला असेच विवेकी आचार दिसून येतील. तडजोडीनें, त्या प्रकारांतला कडवटपणा काढून टाकून, उजळा देण्यांत येतो–आणि तो देण्यांतच धारिष्ट व समयज्ञता आहे. उलट, तशी तडजोड करण्याइतकी विवेकी वृत्ति नसली तरी, आयुष्याला इतर व्यवधानें असल्यामुळें, त्या प्रकाराकडे निदान काणाडोळा करण्याइतकी तरी कुणा–कुणाच्या मनाची तयारी झालेली दिसते.

प्रस्तुत कथेंतील गृहस्थ विवेकी नाहीं आणि त्याच्या आयुष्याला दुसरा पैलू नाहीं, दुसरे ध्येय नाही, दुसरी ओढ नाहीं. त्याचा सगळा जीव मुलीवर, मुलीच्या सुखानें तो सुखावणारा आणि मुलीच्या व बायकोच्या ऐहिक सुखसोयीसाठीं–ऐष आरामासाठीं अविश्रांत राबणारा ! पण, त्याचें एकमेव

सुखसर्वस्व जरी कन्या असली तरी तिचें सुखसर्वस्व तो नव्हे. निसर्ग-नियमानुसार तिच्या शरीरधर्मानें आपला प्रभाव दाखवतांच-स्त्रीस्वभावसुलभ विकारजागृतीच्या प्रवाहांत ती वाहूं लागतांच ह्याच्या आयुष्याच्या इति-कर्तव्यतेचा पार चुराडा झाला! आणि तो चुराडा कसा झाला तो दोन तऱ्हेनें दाखविला आहे—वस्तुस्थितीचें ज्ञान होतांच वडिलांचा झालेला आग-डोंब आणि त्या आगडोंबांत जीविताची झालेली रक्षा, असे द्विविध मनो-व्यापार फार बारकाईनें दाखविण्यांत आले आहेत. मनाचा मागोवा सूक्ष्म-पणानें घेत जाण्यांत झ्वाइगची सर्व हातोटी समाविष्ट झालेली असते.

ह्या शोकांतिकेला एकीकडून अशा रीतीनें ज्याचा तोच—कुटुंबांतील कर्ताच कारण आहे. तथापि ही कलाकृति "जीवितावरील भाष्य" ह्या वाङ्मयीन कसोटीला पूर्णपणें कशी उतरली असेल ह्याचा विचार करतांना, अर्थातच, त्या गृहस्थाची बायको व कन्या दुसरीकडून कारण आहेत, असें दिसून येईल. 'दिसून येईल' असें म्हणतांना, गोष्टींत त्या व्यक्ती उभ्या केल्या आहेत म्हणूनच म्हणायचे, असें नाहीं. ज्या समाजांतलें हें चित्रण आहे त्या समाजावर मायलेकीच्या रूपानें प्रखर टीकाच केली आहे. पण ही टीका व्याख्यानस्वरूपी नाहीं, हें विशेषत्वानें लक्षांत घ्यायला हवें. ललित वाङ्मयांत सामाजिक किंवा राजकीय वातावरण व प्रश्न असावेत हें तत्त्व मान्य असलेले लेखक प्रत्यक्ष व्याख्यानबाजीच करतात, त्या प्रश्नांची सभामंडपीय चर्चा करतात. परंतु झ्वाइगनें तसा प्रकार केलेला नाही. ऐहिक सुखोपभोग हेंच ज्या समाजाचें जीवनसूत्र असतें, त्या सामाजांतील व्यक्ति नाजुक व उदात्त भावनांना, कर्तव्याला व ऋणानुबंधांना पारख्या होतात. आपल्यासाठी दुसरा कोणी कांहीं त्याग करीत आहे ह्याचें त्यांना विस्मरण पडतें; नव्हे, तें त्यांच्या मनांतच मुळीं येत नाहीं. दुसऱ्याच्या भावनांची त्यांना किंमत वाटत नाहीं, पर्वा नसते, जाणीवच होत नाहीं.

आत्मपूजेपलीकडे त्यांना कांहीं सुचतच नाहीं–इतर सर्व कोमल भावनांविषयीं त्यांचें मन बोथट बनतें–किंबहुना त्यांच्याकडून विपर्यासच होतो. ही टीका–टीकाकाराप्रमाणें चर्चा न करतां–केवल दोन प्रातिनिधिक व्यक्तींची वर्तणूक दाखवून, ही समाजटीका लेखकानें केली आहे.

कुटुंबियांसाठीं उरीं फुटेपर्यंत राबून, घरांत द्रव्यराशी घालणाऱ्या घर-धन्याबाबत " त्यांना दुसऱ्या कशांतच कळत नाहीं कीं गोडी वाटत नाहीं " असा त्या मायलेकी ग्रह करून घेतात, ह्यापरता हृदयभेदक विपर्यास कोणता ? आणि त्याचें मन संसाराला मुरडलें, त्यानें सर्वसंगपरित्याग केला, अलिप्तपणा पत्करला, निवृत्ताचें जीवन अंगिकारलें आणि एक प्रकारचा आत्महोम मांडला तरी त्या मायलेकीना कांहीं चुकल्यासारखे कुठें वाटले ? किंवा त्यांनीं आपला आयु:क्रम कुठे सुधारला ? किंवा त्याच्याजवळ दिलगिरी तरी कुठे व्यक्त केली ? सारांश, भोगैकवृत्तीच्या समाजांत नाजुक नि कोमल भावना बाळगणाऱ्या कुटुंबियाची आहुती पडणें अपरिहार्य आहे, हेंच झ्वाइगला दाखवावयाचें आहे असे वाटतें. ' मन एव मनुष्याणाम् कारणं बंधमोक्षयो: ' हें जितके खरें तितकेंच, समाजाची दृष्टि केवळ ऐषआरामाकडेच वळली कीं कुटुंबधारणेला अवश्य असलेल्या नाजुक नि कोमल ऋणानुबंधांचा होम झालाच म्हणून समजावें हेंही खरे ! संयम, त्याग आणि दुसऱ्यांच्या जीवनाचा सहानुभूतिपूर्वक विचार ह्या विश्व–कुटुंबी वृत्तीचा पाया घरांत घातला जातो. पण पाश्चिमात्य समाजांत भोगैक वृत्तीच बोकाळल्यामुळें घराचें घरपण कसें उखडून चाललें आहे, हें ही कथा अतिशय परिणामकारक रीतीनें सूचित करीत आहे—प्रवचन न देतां करीत आहे. ( अनुवादाची ही उस्तवारी करण्यांत हा हेतु आहे. )

झ्वाइगच्या कलाकुसरीबद्दल किती लिहावे ? कथेंतील ओळ न् ओळ तिनें नटलेली आहे. भावकथेला जी गती हवी असते ती तर अगदीं सुरुवातीपासून

घेतली आहे; जणु कांहीं, जमिनीवर न घोटाळतां एकदम उड्डाण घेणारें विमानच! त्याप्रमाणेंच, चित्रणविषयक व्यक्तीचा स्वभाव सहजगत्या प्रस्थापित करण्याची सुद्धां चपळाई अगदीं पहिल्या परिच्छेदापासूनच व्यक्त झाली आहे. स्वताच्या जीवाला धोका उत्पन्न करणाऱ्या व्याधीचें निदान करून घेण्याऐवजीं हा 'गृहस्थ' कुटुंबियांच्या चैनीखातर थंड हवेच्या ठिकाणीं जायची योजना तत्परतेनें अमलांत आणतो. प्रक्षोभाची तार ताणण्याची परमावधि झाल्यावर संसारविमुखतेसाठीं स्वप्नसाक्षात्काराचा उपयोग जितका औचित्यपूर्ण तितकाच 'स्वभावांतील परिवर्तनाचा क्रान्तिबिंदु' ह्या दृष्टीनें त्या स्वप्नाचा सूक्ष्म आणि भयानक तपशीलही अनुभूतीचा अप्रतिम द्योतक आहे. त्याचप्रमाणें संसाराला विटल्यानंतरच्या वर्तनाचा तंतु न् तंतु दाखविण्यांत निरीक्षणाची परमावधि दिसते. विमनस्कतेंतील गैरसावधपणा वर्णन करतांना, त्या वयोवृद्धाच्या डोळ्यांतले तेज लुप्त होत असल्याचा उल्लेख, अलिप्तता सांगतांना त्यानें चाकर-नोकरांच्या दरवाजानें वहिवाट करणें, आणि शेवटच्या दिवशीं आपल्या फर्ममध्ये जाऊन नित्याच्या खुर्चीवर एकदां अखेरचें बसून घेणें, अशा किती तरी बाबींकडे अंगुलिनिर्देश करतां येईल. त्या खुर्चीवर अखेरचें बसून बघण्यांत, त्या निर्जीव वस्तूचा जिव्हाळा देखील त्या अलिप्ताच्या अंतर्यामीं अंशमात्रानें तरी वसत होता; पण त्याच्या जिवाला ज्यांचा लळा होता त्या सजीव कुटुंबियांबद्दल मात्र जी एकदां किळस आली ती कायमचीच, हें दाखविण्यांत मनाच्या निरगांठीची लेखकाला किती स्पष्ट कल्पना आहे हें कळून येतें. आणि कन्या जें सुगंधित तेल वापरीत असे त्याच्या वासाचा उपयोग तर फारच मार्मिकपणाचा आहे. पहिल्या खेपेस त्याचा निर्देश आला आहे तेव्हां, त्याचें इतकेसें महत्त्व वाटूं नये इतका तो सहज ओघांत केला आहे. पण दुसऱ्यांदा, अखेरच्या क्षणीं, त्याचा जो उपयोग करून परिणाम साधला आहे तो पाहिला म्हणजे,

पहिल्या उल्लेखांतलें स्वारस्य कळतें. वैयक्तिक राग-लोभाचीं, प्रीति-अप्रीतीचीं, आवडी-निवडीचीं पाळेमुळें आंतर मनांत खोलवर जाऊन दडलेलीं असतात व ती अशा रंग-रस-गंध-साहचर्यानें अनपेक्षितपणें वर येतात, हा जो मानस-शास्त्रज्ञांचा सिद्धान्त आहे त्याचा ह्या कथेंत जागरूकतेनें उपयोग करून घेतला आहे. असो.

जीविनविषयक शाश्वत मूल्यांवरची अचल निष्ठा, मानव – स्वभावाचे सूक्ष्म आणि अचुक निदान, तें सांगण्यांतील समरसता व उत्कटता आणि ह्या सर्वांला चपखल कलाकौशल्याची जोड, ह्या गुणांनीं हा लेखक जगन्मान्यता आणि वाङ्मयांत अमरपद पावला आहे. अशा लेखकाची ही प्रभावशाली कथा मराठी वाचकांना खास उद्बोधक होईल, प्रणंचाची चांगली शिकवण देईल.

❦ ❦ ❦

शेवटीं नमूद करावेसें वाटतें कीं परक्याच्या विहिरीवर मोट लावून हा मीं उपसा केला आहे. विहिरींतले पाणी उपसतांना मोट हेदकाळते आणि त्यामुळें कांहीं पाणी परत विहिरींत पडतें. हें अपरिहार्य असले तरी, आवश्यक तेवढे वर काढून आणण्यांत कसूर केली नाही; इतकेच नव्हे तर मोट होतां होईल तो हेंदकाळली जाऊं नये म्हणून सावधगिरी ठेवली आहे. मराठी भाषेच्या फरसबंदी मोटवणांत व पाटवणांत हें पाणी गढूळ झाले नसेल, अशी ही पण उमेद आहे.

सातारा शहर
हनुमान जयंति, १८६६

*यशवन्त दिनकर पेण्ढरकर*

## चित्र-परिचय

वेष्टणावरील चित्र श्री दीनानाथ दलाल यांचें आहे आजवर अनेक ग्रथाची सजावट श्री दलाल यानी कुशलतेने केली आहे पण ह्यावेळी विशेषत्वानें सांगायचे म्हणजे हें की प्रस्तुत चित्र ह्या कादंबरीसाठी काढलेलें नाही ही कादंबरी कोणाच्याही ध्यानी-मनी नव्हती अशा वेळी-काही वर्षापूर्वी-हे चित्र श्री. दलाल यानी स्वतत्रपणें काढलें चित्र-कला-प्रदर्शनातून हें मिरवलेले आहे, आणि ह्याने प्रशंसा व यश याची कमाई चित्रकाराला करून दिली आहे आज ही कृति चित्रकाराची ‘ स्नेह भेट ’ म्हणून माझ्या संग्रही मी साभिमान बाळगून आहे

बाणानें घायाळ झालेला हा हरिण आपले ठिबकणारें रक्त चाटीत आहे. हा त्याचा स्वभावधर्मच आहे, असें श्री दलाल म्हणतात.

प्रस्तुत कथेंतील नायक दैवाच्या अनपेक्षित शरसंधानानें असाच विद्ध झालेला असून, तो कुणाचेंच पारिपत्य करूं शकत नाही. परिवारांतील स्वकीयांच्या वर्तनानें त्याचा मर्मभेद झाल्यावर, तो आपल्याशीच तडफडतो, आपल्याच जिवाचे लचके तोडतो त्याचें कोणीच जिवा-भावानें सांत्वन करूं इच्छीत नाही आणि कुणाच्या सात्वनानें त्याची हृदयव्यथा शमण्यासारखीही नाही जो बाण अंतर्यामी घुसला तो प्राणहरण करणाराच ठरला त्यानंतर त्यानें अंगिकारलेला जीवन-क्रमही तसाच एकातिक होता पर्णहीन वृक्ष, त्या वृक्षाच्या शाखेवर त्याच्या प्राणोत्क्रमणासाठी टपून बसलेलीं बुभिक्षित गिधाडें आणि अस्तमान–समयीचा वाढता अधकार, ह्या पार्श्वभूमीतील सूचकता कथावस्तूशी समर्पकतेनें जुळत आहे अशा विचारानें ह्या चित्राची वेष्टणासाठी केलेली योजना रसिकाना औचित्यपूर्ण वाटेल

**य. दि. पें.**

दैव, कधीकधी जबरदस्त आघाताशिवायच, पहिलवानी ताकदीच्या रासवट दणक्यावांचूनच, मानवी हृदय खिळखिळें करून टाकतें. सारे मानव प्राणी म्हणजे दैवाच्या हातांतली खेळणी होत ह्या खेळण्यांनी खेळायच्या आपल्या अनावर नादात, अगदी किरकोळ आणि सहजासहजी घडणाऱ्या हालचालींनी, हें अवखळ दैव आपलें विध्वंसक कार्य लीलया उरकीत असतें. आणि म्हणूनच कार्य – कारण – भावाचा विचार करतांना, कारणीभूत असलेलें क्षुल्लक निमित्त आणि त्याचा घडून आलेला भयंकर परिणाम ह्यांतल्या तफावतीत प्रमाणाचा काहीच मेळ नसलेला पाहून आपण आश्चर्यचकित होतो आणि तसें आश्चर्य वाटणें स्वाभाविकही आहे. ज्याप्रमाणें आजार–किरकोळ का असेना– जेव्हा प्रथम दृष्टोत्पत्तीस येतो तेव्हांपासूनच त्याचा प्रादुर्भाव झाला असें आपण समजतों, त्याप्रमाणें दृष्टोत्पत्तीस आल्या क्षणापासूनच दैवाच्या दुष्ट विलासाचाही प्रारंभ होतो, असें आपण मानतों. पण

खरें म्हणजे, बाह्यात्कारी स्वरूप व्यक्त होण्याच्या कितीतरी पूर्वीपासून दैव मनुष्याच्या आन्तरिक जीवनांत हात घालून, त्याचें मन आणि शरीर ह्यांची मोडतोड आगाऊच सुरूं करीत असतें. त्याचा जेव्हां उमग पडतो तेव्हां कुठें आपण फक्त बचावाचें धोरण स्वीकारतों,- पण उमग पडतो तो बहुशा फार उशीरानें !

# १

उन्हाळ्यांत थंड हवेच्या ठिकाणी कांहीं दिवस निवान्तपणी घालवावेत म्हणून यंदा सोमनाथ सहकुटुंब माथेरानला येऊन राहिले होते. एका रात्री भयंकर कळा येऊन त्यांना जाग आली. लोखंडी पट्टयांनी ( कापसाचा गठ्ठा आवळतात त्याप्रमाणें ) जणुं कांहीं, आपणाला कोणी करकचून आवळीत आहेसें त्यांना भासले. श्वासोच्छ्वास करणेंही त्यांना कठिण पडूं लागले. त्यांच्या नेहमींच्या डॉक्टरानीं त्यांना मुंबईस जाऊन निष्णात चिकित्सकांचा सल्ला घेण्याबद्दल मागेच एकदां सुचविले होतें. कारण त्यांच्या मतानें हीं लक्षणें पित्ताश्मरीचीं ( *gall-stone* ) होती. परंतु, डॉक्टरी सल्लामसलत तितकीशी मनावर न घेतां, त्यांनीं कुटुंबियांच्या इच्छेखातर माथेरानची

वाट धरली होती. आधून मधून अशा चमका सुरू होत; आजची खेपही त्यासारखीच असल्यामुळें ते घाबरून गेले. त्यांनीं आपला दुखरा भाग आखडून घेऊन, हातांनीं चोळायला सुरुवात केली. अंमळशानें कांहींसें हलकेंही वाटूं लागलें. तरीपण शारीरिक वेदना चालूंच होती. " आपणाला ज्याचा कधी सराव नाहीं तसलें अन्न ह्या ' निवासांत ' खावें लागलें; तें काय आपणाला पचतंय ? त्या अपचनाचा हा परिणाम असावा ! कदाचित, कांहीं कळकलेलं अन्न पोटांत जाऊन, तें तर बाधलें नसेल ना " अशा शंकाकुशंका त्यांच्या मनांत आल्या. अर्थात् ह्यांतला कोणताही कयास पित्तशूळापेक्षां कमी भयावह ! पण चमका आणि त्यांचें एक प्रकारचे दडपण चालूंच राहिलें. स्वस्थ पडून राहणें त्यांना शक्य नव्हतें. मोठ्या कष्टानें आणि कण्हतकुंथत ते बिछान्यावरून उठले आणि खोलींतल्या खोलींत येरझाऱ्या घालूं लागले. आंथरुणांत आडवें पडून राहण्यापेक्षां उभें राहण्यानें आणि ती तशी हालचाल करण्यानें चमकांचा जोर बराचसा कमी झाला. तथापि ती टाचगी खोली म्हणजे तुरुगांतली कोठडीच त्यांना वाटूं लागली. शिवाय लगतच्याच बिछान्यावर त्यांची पत्नी निजलेली होती आपल्या हालचालीनें ती जागी व्हायची आणि उगीच तिला काळजी वाटूं लागायची, त्याचा त्यांना संकोच वाटूं लागला. त्यांतून आणखी मोकळ्या अंगानें जर आपणाला ऐसपैस फिरायला सांपडलें तर खासच अधिक बरे बाटूं लागेल ह्या भावनेनें अंगांत लांब कोट आणि पायांत सपाता घालून हलक्या पावलीं ते सज्जांत बाहेर आले.

शय्यागृहाचें दार उघडून ते बाहेर आले तोंच शेजारच्या प्रार्थना मंदिराच्या घड्याळाचे ठोके त्यांना त्या निवान्तपणीं नुसते स्पष्ट ऐकूं आले इतकेंच नव्हे तर सज्जाच्या सताड उघड्या असलेल्या खिडकींतून तें घड्याळही ठळकपणें दिसून आलें. पहांटेचे चार वाजले होते. त्या लांबच लांब

सज्जांत अंधार होता. पण दिवसा – उजेडीं त्यांतून येतांजातांना वाटेंत आंवतीं भोवती काय कुठें आहे ह्याची त्यांना पूर्ण कल्पना आली होती; आणि आठवणही तितकी धड होती. तो सज्जाही चांगला सरळ आणि ऐसपैस रुंद होता. सखोल दीर्घ श्वासोच्छ्वास करीत सज्जाच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सोमनाथ फेऱ्या घालूं लागले. प्रत्येक फेरीला अधिकाधिक बरेंही वाटूं लागलें. व्यथेचें दडपण जलदीनें दूर होत चाललें आहे अशी भावनाही त्यांना होऊं लागली. त्या शतपावलीनें इतका चांगला परिणाम झाला की ते परत आपल्या खोलींत जाण्याच्या बेतांत होते. इतक्यांत कसलासा आवाज होऊन ते चमकले. कोणी तरी अंधारात कुजबूज करीत असल्याचें – अस्पष्टपणें पण खात्रीनें कोणी तरी कुजबूज करीत असल्याचें त्यांना ऐकूं आले. दारांच्या फळ्यांचा करकर आवाज, फिरून कुजबूज, कांहीं हालचाल – सर्व कांहीं त्यांच्या कानी आलें. इतक्यांत, त्या उघडल्या जाणाऱ्या दाराच्या फटींतून प्रकाशाचा झोत बाहेर आला. इतका वेळपर्यंत तिथें असलेला एकजिनसी अंधार त्या उजेडाच्या झोतानें दुभंगला गेला. अगदीं अभावितपणे, सोमनाथ – तो वयस्क गृहस्थ मागच्या पावलीं कोपऱ्यात आडबाजूस झाला. काय प्रकार आहे तो जाणून घेण्याची त्याला जिज्ञासा होती अशांतला भाग नव्हे; पण त्याची त्यालाच स्वतांच्या अवस्थेची कांहींशी शरम वाटली. अशावेळीं, अशा रीतीनें, आपण भटकत आहो, हे लोकांना दिसून येणे त्याला प्रशस्त वाटलें नाहीं. मागच्या मागें अंग चोरून तो जरी लपून राहिला होता, तरी त्या सज्जांत किंचितकाल पडलेल्या उजेडांत एक स्त्री – शुभ्र वस्त्र परिधान केलेली एक स्त्री त्याला दिसून आली. त्या खोलीतून चटकन बाहेर येऊन सज्जाच्या दुसऱ्या टोंकाकडे ती जाऊं लागली. नंतर तिनें ओढून घेतलेल्या दाराचा आवाजही त्याच्या कानीं आला. आणि फिरून सारे कांहीं सामसूम झालें.

काळजाला वार भिडावा त्याप्रमाणें त्या म्हाताऱ्या सोमनाथाचें सर्वांग लटलटा कापूं लागलें. बंद केलेल्या दारांचा तो आवाज सज्जाच्या ज्या टोंकाहून आला तिकडे फक्त त्याच्या स्वतांच्या कुटुंबासाठीं मिळालेल्या खोल्यांचाच काय तो विभाग होता. ती व्यक्ती – छे, ती आपली बायको मुळींच नव्हे ! कारण, थोडयाच मिनिटांपूर्वी आपण बाहेर पडलो त्यावेळीं ती आपल्या खोलींतच गाढ झोपलेली नव्हती कां ? मग काय, – माझी मुलगी आरुणी तर ती नव्हे ? हो; दुसरा कोणताच तर्क संभवत नाहीं ! आरुणी– ती तरुणी आरुणी – एकोणीस वर्षांची आरुणी ! – तिच्याशिवाय दुसऱ्या कोणाची कल्पना करावी म्हटलें तर आहे कोण आणखी त्या बाजूला ?

हा विचार मनाला चाटून जातांच त्याचें सर्वांग थर्रर्र झालें. "ती आरुणी असणें तरी कसं शक्य आहे ? हां, तशी ती बेडर नी स्वच्छंद मुलगी आहे हें खरं ! पण तसं म्हटलं तर अजून ती पोरच आहे कीं ! छे, आपली कांहींतरी चूकभूल होत असावी ! एकाद्या परक्याच्या खोलींत असं काय काम असणार तिचं इतक्या अपरात्री–तसा कांहीं... ? " चालून येणाऱ्या हिंस्र श्वापदाला पिटाळून लावावें त्याप्रमाणें त्यानें तो विचार मनांतून तिरीमिरीनें काढून टाकण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ, त्यापासून त्याला स्वतःची सुटका करून घेतां आली नाही ! कितीही अप्रिय आणि भयंकर असला तरी त्याचा तो तर्क अचुकच होता. त्या सज्जांतून कसाबसा चाचपडत, आडखळत आणि धापा टाकीत तो ( आपल्या खोलीच्या पलीकडेच असलेल्या ) तिच्या खोलीपर्यंत जाऊन पोहोंचला. आणि—हाय रे दैवा !— तिच्या खोलींत प्रकाश होता–दाराच्या पायथ्याच्या फटींतून आणि अंगच्या कुलुपाच्या छिद्रांतून तो त्याला दिसून आला; पाठोपाठच कट् असा आवाज त्याला ऐकूं आला. आणि फिरून चोहीकडे अंधार झाला ! आपण कांहीं चूक करीत आहों अशी मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न करण्यांत आतां कांहीं

हांशील नव्हतें. एका तिन्हाइताच्या शय्यागृहांतून पहांटे चार वाजतां गुपचूप बाहेर पडून चोरपावलानें आपल्या खोलींत जाणारी ती आरुणीच— आपली कन्या आरुणीच होती ती !

म्हातारा सोमनाथ भीतीनें थरथर कापूं लागला. त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला, आणि घामानें त्याचें अंग गार झालें. त्याच्या मनांत पहिला विचार आला तो हा कीं खाडकन् दार उघडावें आणि त्या निर्लज्ज कारटीला दणादण दणके द्यावेत ! परंतु त्याचे पाय लटलटूं लागले. आपण कोलमडून पडतों कीं काय असे त्याला वाटले. तो जेमतेम आपल्या खोली-पर्यंत परतला; आणि, आंत दाखल होतांच, धाडकन् अंथरुणावर त्यानें आपले अंग लोटून दिले;—भाले-बरच्यांनीं विद्ध झालेल्या काळविटाप्रमाणें तो कोलमंडला.

* * *

उघड्या डोळ्यांनीं – रोखलेल्या नजरेनें तो तिथे काळोखांत निश्चल पडून राहिला. लगतच्या बिछान्यांत त्याची बायको निजलेलीच होती. तिला कशाचीच दाद नव्हती; जोरजोरानें, एका लयींत चाललेले तिचे श्वासो-च्छ्वास त्याला ऐकूं येत होते. तिला उठवावी, आपणाला ज्या भयंकर गोष्टीचा सुगावा लागला आहे ती तिला सांगावी आणि अशा रीतीनें आपल्या क्षोभाला वाट करून द्यावी, असेही त्याला एकदां वाटले. परंतु त्याच्या तोंडून शब्द फुटणें तरी शक्य होतें कां ? अगदीच अशक्य ! मग काय, करायचं तरी काय ?

त्यानें शांतपणें विचार करण्याचा प्रयत्न केला; पण त्याच्या चित्तांत सर्व विचारांचा एकच कल्लोळ माजून राहिला होता; पाकोळ्यांप्रमाणें ते इत-स्ततः भिरीभिरी घुमत राहिले. कशावरच त्याचा विश्वास बसेना. आरुणी, आपली गोड छोकरी ! आपली लाडकी आरू ! इतकी साधी-भोळी, इतकी

निरागस, इतकी लघाळ डोळ्यांची......फार कांहीं दिवस झाले नसतील; पुढ्यांत अंकलिपी घेऊन, त्यांतल्या ओळीवरून गुलाबकळीसारखं नाजुक नि बारीक बोट फिरवीत, महाप्रयासानें ती एक एक अक्षर लावून वाचीत होती. आणि एकदां आभाळी रंगाचा झगा घालून शाळेंत गेली होती तेव्हां, तिला आपण घरीं घेऊन येत असतांना, वाटेतल्या एका दुकानांतून तिला लिमलेटच्या गोळ्या घेऊन दिल्या आणि त्यांनीं चिकट झालेल्या तिच्या ओठ-पाकळ्यांचा गोड गोड साखर–चुंबा आपण घेतला; त्याला तरी असे कितीसे दिवस झालेले असतील ? अगदीं परवां–परवांच नव्हे कां ते ?—छे; वर्षा-मागून वर्षें गेलीं त्यावर किती तरी ! पण, एका कापड दुकानाच्या कांचेच्या तावदानांत दिसलेला सोनसळी निळा पुल् ओव्हर मनांत भरल्यामुळें तो विकत घेऊन देण्यासाठीं तिनं लाडीगोडी लावली—अगदीं एखाद्या मुला-सारखी भुणभुण लावली माझ्यामागं, त्याला तर फार दिवस लोटले नाहींत ना ? माना वेळून, खांदे आखडून, हातांशीं चाळा करीत, हांसऱ्या मुखानें तिनें माझ्यापुढें जी अमोघ गयावया केली ती डावलणें माझ्याच्यानें कधीं तरी झालें असतें का ? पण आज माझ्या दारापासून कांहीं तमूंच्याच अंतरावर असलेल्या आपल्या खोलींतून ती मला न–कळत लपत छपत बाहेर पडली —तिऱ्हाइताची शेज धुंडाळण्यासाठीं !

“ छे छे ! आतां मात्र हद्द झाली ! ” वृद्ध सोमनाथानें सुस्कारे सोडले. “ काय निर्लज्जपणा हा ! काय बेशरमपणा हा ! जिला मीं इतक्या कोडकौतुकानं न् जिवाभावानं लहानाची मोठी केली ती ही माझी छोकरी ! अन् कोण असेल बरं तो ? आम्हांला इथें येऊन तर उणेपुरे तीनच दिवस झाले ! तो बसकट चौकोनी चेहऱ्याचा पागलकोटचा जहागिरदार काय, किंवा तो बडा लष्करी अम्मलदार काय, किंवा तो शृगालपूरचा संभावीत जॉकी काय – ह्या रंगेल त्रिकूटापैकीं एकही तिला

पुर्वी कधींसुद्धां भेटला नव्हता ! इथे आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं तो नाच-रंगाचा उरूस झाला त्यावेळींच काय ती तिची नि त्यांची प्रथम ओळख झाली ! आणि एवढ्या तांत्रिक ओळखीच्या तुटपुंज्या भांडवलावर हें सारें मीं समजून चालायचं का, कीं...... ! पण अवघ्या एकाच गांठीभेटींत तिची इतकी मजल जाईल ? छे, शक्य नाहीं वाटत हें ! ही कथा बरीच जुनी असली पाहिजे, घरीं असल्यापासूनच सुरवात झाली असली पाहिजे ! आणि मला—मूर्खच नव्हे कां मी ?—मला ह्याची कुणकुण सुद्धां नाहीं ! अन्, नाहीं तरी मला काय पुरती ओळख आहे माझ्या कुटुंबियांची ? सबंध दिवस त्यांच्यासाठी मर मर मरावं, तब्बल चौदा-चौदा घण्टे मानेवर खडा ठेवल्याप्रमाणं टेबलाशी जुंपून घ्यावं !—पूर्वी जसा, मालाच्या नमुन्यांची पेटी घेऊन, गिऱ्हाईक मिळविण्यासाठी गांवोगांव नि दारोदार वणवण करीत होतों तसाच ! पैसा मिळवायचा, खूप खूप पैसा मिळवायचा ! ह्यांची चंगळ चालावी, हरतऱ्हेचा कपडालत्ता ह्यांना विकत घेतां यावा, आपण श्रीमंत आहोत ह्या भावनेशीं खेळायला मिळावं ह्यांना म्हणून ! दमून भागून आपण घरीं यावं, आणि यांनीं नाटकं-सिनेमा पाहायला खुशाल निघून जावं, किंवा चहापार्टींच्या आणि नाचरंगाच्या मजलशींना चालतं व्हावं ! आपले दिवस ही मंडळी कसे घालवतात—दिवसां ह्यांचे काय काय उद्योग चालतात, ह्यांची मला कुठं दखल होती ? मला जें कांही कळून आलं आहे तें हें एवढं ह्या रात्रीं ! ह्या–आजच्या रात्री माझ्या मुलीनं आपली भरनवतीची देहलता एका वाटेच्या वाटसरूला बाजारबसवीप्रमाणं अर्पण केली ! बेशरम ! निर्लज्ज ! ”

कण्हल्यासारखा आणखी एक दीर्घ सुस्कारा त्यानें सोडला. प्रत्येक नव्या विचारानं त्याच्या हृदयाची जखम ज्यास्त ज्यास्त खोल जाऊं लागली. आपल्या डोक्याची कवटी फुटून मेंदू बाहेर आला आहे आणि तिथें लालभडक कृमि-कीटक डसले आहेत, माशा घोंघावत आहेत, असें त्याला वाटूं लागलें.

" हें सारं मीं कां खपून घ्यावं? ती—ती छबकडी वारयोषिता तिकडं खुशाल पांघरूण ओढून घेऊन आरामांत घोरत पडली आहे अन् मी—कां म्हणून इकडं विच्छिन्न अंतःकरणानं तडफडत पडावं? तडक तिच्या खोलींत शिरून, ' कारटे, मला तुझा निर्लज्जपणा सारा कांहीं कळून चुकला आहे.' असं बेधडक कां सांगूं नये मीं तिला? सरळ सरळ तिच्या पुढं उभा राहून, मीं तिला सडकून फोडून कां काढूं नये? मी दुबळा आहे, मी भ्याड आहे, म्हणूनच; नाहीं तर काय? मी आजपर्यंत ह्या मायलेकीशीं वागतांना गोगलगाईसारखा मऊपणा दाखवीत आलों आणि त्यांचंच सगळं चालून दिलं! त्यांना सुखांत राहतां यावं, आपल्याला कितीहि श्रमसायास पडले तरी हरकत नाहीं पण त्यांना ऐष-आरामांत, आनंदानं काळ घालवतां यावा, ह्यांतच मी आजवर संतोष नि सार्थक मानीत आलों! पै-पै करून पैशाच्या राशी घालतांना माझ्या हाताला घट्टे पडले! ह्यांना कांहीं कमी पडूं नये, इकडची काडी तिकडं करायला लागूं नये, चैनींत राहायला मिळावं म्हणून, मी कष्ट करतांना बोटं हाडापर्यंत झिजवलीं—हाडाचीं काडं केलीं! आणि ऐश्वर्यांत लोळत पडायला मिळावं इतकी ह्यांच्यासाठीं कमाई करून ठेवल्यावर, आतां ह्यांना माझीच लाज वाटूं लागली! त्यांच्या नोकझोकाच्या मानानं मी ह्यांना बावळट दिसायला लागलों! मी गांवढळ आहे असं ह्यांना वाटूं लागलं!... बावळट अन् गांवढळ! नाहीं तरी मी कुठून नि कसा झकपक असणार? बाराव्या वर्षीच मला शाळेला रामराम ठोकावा लागला; आणि पोटाच्या पाठीमागं लागून भटकावं लागलं! डोक्यावर मालाच्या नमुन्यांचं खोकं घेऊन खेडोंपाडी पायपिटी करावी लागली, शहरं धुडाळावीं लागलीं, तेव्हां कुठं धंद्यांत स्थिर होण्यासारखी स्थिति आली! अशा रीतीनं राबून, धावाधाव करून, ह्या जगांत डोकं वर काढलं आणि स्वतःचं घर उभं केलं! इतकं करून देखील ह्यांना माझी पत आणि मीं मिळवलेलं नांव पुरेसं मोहक

आहेसं वाटेना ! समाजामध्यें यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून—नुसतंच "सौ. बाईसाहेब" एवढ्या मामुली. मायन्यानेंच हिची बोळवण होऊं नये म्हणून, भीक मागून, सरकारी अधिकाऱ्यांची खुषामत करून पैशाच्या मोबदल्यानं पदवी पैदा केली ! ह्यांना प्रतिष्ठितपणा हवा होता ! ह्या प्रतिष्ठेच्या पोकळ भपक्याच्या भुलीबद्दल मीं निषेध प्रदर्शित केला, शिष्ट समाजांत मिरविण्याच्या ह्यांच्या मोहाबद्दल मीं नापसंती दाखवली तर उलट ह्यांनीं, तुच्छतेनें हांसून माझाच उपहास केला ! ... माझ्या आईनं असल्या दिखाऊ बढाईखोरपणाचा कधींसुद्धां हव्यास धरला नाहीं; तिळमात्र दिमाख न दाखवतांना अगदीं साधेपणानं आपला संसार केला.—धन्य असो त्या माउलीची—आपला नवरा बरा कीं आपलीं मुलंबाळं बरीं—ह्या परती कशाचीहि तिनं भ्रामक चाड बाळगली नाहीं ! तिची सर ह्यांना कुठून यायला ! अन् ह्याच उलट माझी कींव करतात ! माझ्या ह्या विचारसरणी-बद्दल मला 'बुरसट' 'बुद्रुक' म्हणून म्हणतात ! 'बाबा, बासनांत बांधून ठेवा हीं तुमची जुनीं मतं' असं म्हणून माझी लाडकी लेक मला वेडावते ! खरंच आहे, मला कुठं ह्यांच्यासारखं यस्-फ्यस् करतां येतंय ? माझी कुठं ह्यांच्यासारखी दृष्टी फांकली आहे ? माझी कुठं बूज मेली आहे ? मी एक अशिक्षित ! इंग्रजीचा गंध नसलेला एक बुरसलेला बुद्रुक आहे मी ! आणि माझी मुलगी, माझी एकुलती एक आधुनिक कन्या, आज खुशाल परक्याच्या पलंगावर रात्र काढते ! काय हा निर्लज्जपणा ! काय हा बेशरमपणा !"

मनस्ताप वाढविणाऱ्या ह्या विचारांच्या वावटळींत त्यानें इतक्यांदा आणि इतक्या जोरजोरानें सुस्कारे सोडले कीं सुखानं झोप घेत असलेली त्याची बायको अखेर जागी झाली !

"कांहीं होतंय का आपणाला ?" अर्धवट झोपेच्या झापडींतच तिनें विचारलें.

त्या वयोवृद्धानें तिला कांहींच उत्तर दिलें नाहीं; इतकेंच नव्हे तर तिला झोपेची परत पुरती गुंगी येईपर्यंत आपले श्वासोच्छ्वासहि आवरून धरले. आणि मग उजाडेपर्यंत–उठायची वेळ होईपर्यंत, घोर·विचाराच्या इंगळ्यांच्या वेदना आणि दारुण मनस्ताप सहन करीत तो आपल्या शरशय्येवर निश्चल पडून राहिला.

# २

सकाळीं नाश्त्यासाठीं मेजाभोवती बाकीची मंडळी अजून कोणीच जमा झाली नव्हती. [सर्वचजण सुखासीन आणि सूर्यवंशी. सुट्टीचे दिवस मजेनें घालवायला आलेल्या लोकांनीं साखरझोप घ्यायची नाहीं तर कोणी ? सोमनाथ–दैवाच्या कठोर क्रीडेतले तें बिचारे खेळणें ! त्याच्या नशीबीं हें सुख कुठलें ? ] तो सगळ्यांच्या आधींच येऊन बसल्यामुळें एकटाच होता. आजाऱ्यासारखा उतरलेला चेहरा, मधून मधून दीर्घ उसासे नि हुंकार,— चहाचा घोट गिळवेना कीं पावाचा घास घशाखालीं उतरेना. त्याच्या विचारांचें भ्रमण सुरू झालें.

" एकटा ! सदोदीत मी एकटा ! सकाळीं ऑफिसला जायला मी

निघालों तरी ह्यांनीं अंथरुणांतच रेंगाळत पडावं!—आदल्या रात्रींच्या नाचतमाशाचं जाग्रण घडलेलं असतं ना ह्यांना? आणि शीणही जायला हवा ना? तसंच, सायंकाळीं घरीं परतावं, तेव्हां सुद्धां एकटेपणा आहेच फिरून! कारण, जिवाला रंजविण्यासाठीं फेरफटक्याला निघायची ह्यांची तयारी झालेली असते, अन् माझी संगत त्यांना नकोच असते तेव्हां!......हा पैसा, ही दुष्ट श्रीमंती, ह्या श्रीमंतीच्या रंगढंगानं बिघडवून टाकलं ह्यांना, माझ्यापासून फारकत केली ह्यांची! केव्हढा महामूर्ख मी, की स्वतः दरिद्र्यासारखा राहून, स्वतःच्या चैनीसाठीं कवडी देखील न खर्चतां, घरांत पैशाचे ढीग घालीत गेलों आणि बिघडवून टाकलं ह्यांना! गेलीं पन्नास वर्षे–तब्बल पन्नास वर्षे—एक दिवस देखील सुट्टी न घेतां, मी एकसारखा ढोराप्रमाणं राबलों, धडपडलों, उरीं फुटेपर्यंत काबाडकष्ट केले—अन् शेवटीं, असा जगांत एकटा पडलों"!

ज्यास्त–ज्यास्त तो अधीर होऊं लागला. स्वाभाविकच जसजसा उशीर होऊं लागला तसतशी त्याची तगमग वाढूं लागली.

"काय जगाची उलथापालथ का झालीय? अजून कशी ती नाहीं येत? झडझडून सगळ्या गोष्टींचा एकदां तिला जाब विचारलाच पाहिजे. आणि ह्यापुढं क्षणभरही इथं न थांबतां, ताबडतोब मुक्काम हालवला पाहिजे! पण अजून कशी ती येत नाहीं? अजून ताईसाहेबांची झोप पुरी झाली नसेल! पाक दिलानं ढाराढूर घोरत पडल्या असतील अजून! अन् मी–हा महामूर्ख–इथं बसून माझ्याच जिवाचे लचके तोडत बसलों आहे! आणि आईसाहेब—त्यांच्याबद्दल तर बोलायलाच नको,—वेणीफणी, रंगरंगोटी, नट्टापट्टा, सारा जामानिमा व्हायला तास न् तास लागतात त्यांना......अकरा वाजायपूर्वीं तोंड दाखवील तर शपथ! मग हें सारं स्वाभाविकच नाहीं का? असल्या

आईसाहेबांचं तें कन्यारत्न;—ती अशी बहकली नाहीं तरच आश्चर्य!... ह्या पैसा, ही नीच श्रीमंती! "

इतक्यांत पावलें वाजलीं; त्याच्या पाठीशीं आरुणी येऊन उभी राहिली होती.

" सुप्रभात बाबा! रात्रीं झोप ठीक लागली होती ना? "

पाठीमागच्या बाजूनें हळूच ओणवून, तिनें आपल्या वडिलांच्या भालप्रदेशाचें फुलपाखरासारखें अबदार चुंबन घेतले. अगदी अवचित, वडिलानीं आपलें मस्तक हळूंच बाजूला केले; तिनें चोपडलेल्या सुगंधित तेलाच्या भपकाऱ्याचा त्यांना नेहमींच तिटकारा वाटे, म्हणूनच केवळ नव्हे, पण तिच्या त्या ओ......

" कांहीं होतंय का बाबा? झोपेंत वेड्या–वाकड्या कुशीवर मान अवघडली वाटतं पुन्हां?– वेटर, कॉफी, बैदा, हॅम–जलदी लाव!– झोपच आली नाहीं वाटतं नीट? कां कांहीं वाईट – साईट बातमी आलीय? "

म्हाताऱ्या सोमनाथानें कांहींच उत्तर दिले नाही. खालीं मान घालून तो जो बसला होता,– तिच्या नजरेला नजर भिडवणें त्याला शक्य नव्हतें. ती खुर्चीवर जाऊन बसली तेव्हां तिचे हातच फक्त काय ते त्याच्या नजरेत आले. हेच ते तिचे गोडस हात नि लोभस बोटे! किती कोडकौतुक होतं त्यांचं त्याला! फार लळा होता,–बायकोच्या हातांची अगदीं हुबेहुब प्रतिकृती......तशीच ती नखांची निगा.....मेंदीचा तो लालचिटुक रंग! सारेच कांही मोहक! पण आज, मेजावरील पांढऱ्या शुभ्र सरपोसावरली त्यांची ती हालचाल, आतां अगदी शिकारी कुत्र्याच्या वळवळीसारखी त्याला वाटली! त्याचं अंग शहारलं. त्याची नजर बुजत बुजत तिच्या सुकुमार दण्डापर्यन्त वर सरकली झोपायला उठायच्या वेळीं, ' शुभरजनी ' चिंतितांना, ह्याच सुकुमार बाहूंनीं तिनें कितीदां तरी आपल्या वृद्ध वडिलांना मिठी मारली आहे – काय, फार दिवस तरी लोटलेत कां ह्याला? त्याची नजर,

तिच्या संथ श्वासोच्छ्वासांनीं हलकेच खालीं वर होत असलेल्या–त्या पुल्-ओव्हरच्या आंतील–उरोजाकडे वळली.

" एका तिऱ्हाइताचीं काल रात्रीचीं हीं खेळणी ! " अतीशय कडवट विचार त्याच्या डोक्यांत थैमान घालूं लागले. " त्या पशूनं काल रात्रीं हिच्या नवतीचे हे कळे कुरवाळले असतील, ह्या माधुरीचा त्या चोरानं उपभोग घेतला असेल ! माझ्या रक्ता–मांसाचे हे पिंड ! ही माझी किशोरी ! "

बेसावधपणानें, एक दीर्घ सुस्कारा त्याच्या मुखावाटे बाहेर पडला.

" काय होतंय, बाबा ? " तिनें कनवाळूपणानें विचारले.

" काय होतंय मला ? " ह्या शब्दांची फिरून त्याच्या मनांतल्या मनांत जुळणी झाली; परंतु त्यांचा उच्चार मात्र मुखावाटे त्यानें केला नाहीं. " कुलटा आहे, ही माझी कारटी कुलटा आहे–आणि हें मला कळलं असून, तिला सांगून टाकण्याचें मात्र मला धारिष्ट नाहीं. "

" कांही नाहीं, कांहीं नाहीं ! " इतकेंच काय तो पुटपुटला.

तिच्या नजरेला नजर भिडविणे त्याला अधिकाधिक अवघड वाटूं लागलें. तिचे प्रश्नार्थक कटाक्ष चुकविण्यासाठीं, त्यानें पुढे पडलेलें एक वर्तमानपत्र उचललें आणि तटबंदीसारखे तें समोर धरलें. त्याचे हात थरथरत होते. " ही नि मी—दोघेच जण आहोंत अजून ! हीच काय ती वेळ आहे बोलून टाकायला ! "

ह्या विचारानें त्याच्या मेंदूवर घणाचे घाव बसूं लागले; पण तोंडून शब्द मात्र फुटेना.

तो ताडकन् उठून उभा राहिला, खुर्ची मागें सारली, आणि लांब लांब पावलें टाकीत खिडकीपाशीं जाऊन बाहेरच्या बागेकडे पाहात राहिला.

क्षणार्धांत आपल्या गालांवरून आसवें ओघळूं लागतील, इतकें आंतून दाटून येत आहेसें त्याला वाटलें. ते अश्रू आरुणीच्या दृष्टीस पडूं नयेत, अशी त्याची इच्छा होती.

# ३

त्या पोक्त सोमनाथाच्या शरीराची एकंदर ठेवण पाहिली असतां तिचा आडमापपणा कोणाच्याही लक्षांत आल्याशिवाय राहात नसे. कंबरेवरचा बांधा जितका बेढब होता, तितकाच खालचा भाग ठुसका होता. त्यामुळें, तें ध्यान म्हणजे एक करुणाजनक दृश्य होतें. बागेंत विमनस्कपणे भटकत भटकत तो बराच बाजूला आला आणि तिथून, दूरवर पसरलेल्या विस्तीर्ण तलावाकडे पाहात राहिला. जरी त्याचे डोळे आसवांनीं तुडुंबलेले होते तरी सभोंवारच्या प्रदेशांतलें सृष्टिसौन्दर्य त्याच्या नजरेंत भरल्याशिवाय राहिलें नाहीं. ठायीं ठायीं उंच वाढलेल्या काळपट हिरव्या वृक्षांनीं आच्छादलेल्या हरित–धूसर टेकड्यांच्या पायथ्यांशीं असलेला तो तलाव चौकटींत

बसवलेल्या भव्य बिलोरी आरशासारखा भासत होता. पलीकडल्या त्या टेकड्यांच्या उतरणी अवघड होत्या; पण आढ्यतेचा त्यांत तिळमात्रही आभास नव्हता. केवळ गंभीरपणानें त्या उतरणी त्या रुपेरी जलाशयावर मंद लहरींची चाललेली पाठशिवणी पाहात बसल्या होत्या—जणुं काही, आपल्या लाडक्या बाल—बालिकांच्या निष्पाप क्रीडा कौतुकाने बघत बसलेली प्रौढ—गंभीर वडील मण्डळीच होती ती ! तें निसर्ग—सौन्दर्य जगन्नियंत्याचे अनन्त आणि प्रसन्न हास्यच गमत होतें ते ! किती दिलखुलास, किती पुष्पखचित्त आणि स्वागतशील ! पावित्र्य आणि आनन्द ह्याचे आवाहनच चालले होतें तिथे !

"प्रसन्नता ? पावित्र्य ?" त्या दुर्दैवी मनुष्यानें आपले मस्तक किंचित् झटकले. "हो, मनुष्याला आपल्या सर्व व्यापतापांचा इथे विसर पडला पाहिजे. आपणही चार दिवस इथे मजेत आनंदात घालवावेत, असाच मी विचार केला होता; कसलीच विवंचना नसलेल्या मनुष्याला हे जग किती उल्हासमय वाटत असेल, अशी मी सुद्धां कल्पना करीत होतों. पन्नास वर्षं धडपड करून, खर्डेघाशी करून, व्यापार करून, थकल्या—भागल्यानंतर एक वेळ इथे येऊन कांही दिवस निवांतपणीं घालवायला सांपडावेत—एकदां, डोळे मिटण्यापूर्वी एकदां तरी, इथं येऊन जावं ! एकदां, पासष्टी उलटल्या· वर, केव्हां 'यमराजाचं येईल बोलावणं,' याचा नेम नाहीं, त्यानें मागून खांद्यावर हात ठेवलाय म्हणूनच धरून चालायला हवं. त्यावेळी, पैसाही उपयोगी पडणार नाही, आणि धन्वंतरीचीही कांही मात्रा चालणार नाही. राम म्हणण्यापूर्वी आपणही कांहीं काळ इथं कंठावा, हरपलेलं विश्रांति—सुख परत उपभोगावं, असं मी म्हणत आलो. माझे वडील म्हणत असत, 'ऐषआराम आपल्यासारख्यांच्यासाठीं नाही.—स्मशानाच्या हद्दीपर्यंत आपलं आपणालाच ओझं चालवलं पाहिजे. आपला खड्डा देखील आपल्यालाच खणायला

हवा ! ' कालपर्यंत वडिलाचे हे बोल मला पटत नव्हते. तितकंसं बरोबर नाहीं त्यांचं म्हणणे, कांहीं झालं तरी आपण शेवटीं शेवटीं तरी थोडे बहुत सुखांत दिवस काढणार, असें म्हणत आलो. कालपर्यंत मी माझ्या मुलीच्या आनंदांत आनंद मानून, तिच्या संगतीत रमून जाऊन, कालपर्यंत मी पूर्ण सुखासमाधानांत होतों. पण आज ! हे माझं सुखसमाधान हिसकावून घेऊन, माझ्या भ्रमाचा भोपळा फोडून, दैवानं मला घोर शिक्षा केली एकदम मारा खेळ खलास ! आज मला माझ्या मुलीशीं बोलायची इच्छा नाही, तिचं तोंड पाहणं मुद्धां मला लज्जास्पद वाटतंय ! घरीं, दारीं, बाजारी, कचेरींत, शय्येवर—कुठंही असलो तरी माझ्या अंतर्यामीं हीच लज्जास्पद गोष्ट आतां घोळत राहणार, सलत राहणार; आणि ती आता कुठं असेल, काय करीत असेल, कुणाकडून जाऊन आली असेल ह्या शंका–कुशंकांनीं मी बेचैन होत राहणार ! मी घरीं परत येतांच, लगबगा मला सामोरा येऊन, लाडानं मला बिलगून, माझं क्षेमकुशल पुसतांना, तिच्या मुसमुसणाऱ्या मुग्धसौंदर्याकडे सकौतुक बघत राहण्यांत सुखसर्वस्व मानणं मला इतःपर शक्य नाही. माझं जेव्हां जेव्हां ती चुंबन घेईल तेव्हां तेव्हां ' ह्यापूर्वीं हिच्या ह्या ओठांचं चुंबन कोणी बरं घेतलं असेल ' हा प्रश्न मनांत डोकावल्याशिवाय राहणार नाही. ती जवळपास नसली तर ओंगळ शंकाकुशंकांनीं माझ्या अंतःकरणाच्या चिंधड्या उडणार, आणि ती समोर आली तर तिच्या नजरेला नजर भिडविण्याची मुद्धां मला घृणा वाटणार ! छे, अशा रीतीनं आयुष्य कंठणं अगदीं अशक्य ! जिवाच्या ह्या रश्शीखेचीत टिकाव धरून राहणं अगदीं–अगदी–अगदीं अशक्य ! "

इकडून तिकडे येरझाऱ्या घालीत असतांना तो आपणाशींच पुटपुटत होता. दारू पिऊन झिंगलेल्या मनुष्याप्रमाणें, चालतांना त्याच्या झुकांड्या जात होत्या. फिरफिरून तो त्या तलावाकडे टक लावून पाही, आणि पाहात

असतांना त्याच्या डोळ्यांतून झिरपणारे अश्रू गालावरून जिवणींत जात, कोटाच्या कॉलरीवर ओघळत. अर्थात् त्याला चष्मा हातांत काढून घ्यावा लागला. अश्रू ढाळीत, त्या बगीच्यांतील अरुंद पायवाटेत तो वेंधळ्यासारखा उभा असतांना, त्याचा अवतार विचित्र आणि हास्यास्पद दिसे. तिथल्या माळ्याचा मुलगा त्याच्या अंगावरून गेला तेव्हां, त्याला त्या म्हाताऱ्याचे तें बावळट ध्यान पाहून नवल वाटलें; त्यानें खाकरूनही पाहिले आणि आपल्या गांवठी भाषेंत रांगड्या चेष्टेची चार-दोन टवाळ विशेषणेंही द्यायला कमी केले नाही अर्थात्, सोमनाथाला त्याचा अर्थ कळला नाहीं खरा, पण तेवढ्यावरून तो जरा भानावर आला. तसे म्हणजे, त्याच्या तऱ्हेवाईकपणामुळें त्याच्याकडे कुणाचेही लक्ष जाणे स्वाभाविक होतें. म्हणून, जिथे आपण नि आपली हृदय-व्यथा–असा निर्वेधपणा मिळेल अशा एका आड बाजूच्या बाकाकडे तो वळला.

तसा निवांत कोपरा शोधून, तो खालीं टेकला असेल नसेल तोच कुणाशाच्या हसण्याच्या आवाजानें – ओळखीच्या आवाजानें तो एकदम चमकला. ह्याच ओळखीच्या हसण्यानें आज त्याचे हृदय पिंजून निघाले. आज एकोणीस वर्षें हें हास्य म्हणजे त्याला एक मधुर संगीत वाटत आले होतें. ह्याच हास्याच्या संगीत लहरींखातर त्याने कितीक, लांबलांबचे, कंटाळवाणे प्रवास तिसऱ्या वर्गाच्या खेचाखेचीत अहोरात्र आंखडून बसून केले होते. हेतु हा की तेणेंकरून संपादतां येणाऱ्या सुवर्ण–मृत्तिकेत मुलीच्या उल्हास–वृत्तीचा फुलोरा अनिर्बंध मोहरला जावा. ह्याच हास्याच्या बहरासाठीं त्यानें आपल्या प्रकृतीचं मातेरे करून घेतले होतें. ह्या लघाळ अधरोष्ठांतून हास्यनिर्झराची अधिकाधिक नादमधुर खळखळ आपणाला हमखास ऐकायला मिळत जावी, हीच काय ती त्याची एकमेव आकांक्षा होती पण आज, त्याच हास्याचे तरंग त्याला भेडसावीत होते—त्याच्या वक्षःस्थलावर वार करीत होते.

हें सारे जरी खरे, तरी तिच्या हंसण्याचा तो खळखळाट ऐकून, त्याला तिच्याकडे वळून बघण्याचा मोह झालाच. ती टेनिसच्या क्रीडांगणावर उभी होती. हातांतली रॅकेट चातीसारखी गरगर फिरवीत, फिरवतां फिरवतां अवचित वर फेंकून पुन्हां झेलींत, ती आपलें मनोरंजन करीत होती. आणि हातानें हा चाळा चालूं असतांना ती मजेंत खिदळली. तिचें हे हस्तलाघव तिघे तरुण मोठ्या कौतुकानें पाहात होते—फ्लॅनेलचा पायजमा घातलेला पागलपूरचा जहागिरदार, रुबाबदार पोषाखांत तो बडा लष्करी ऑफिसर आणि तुस्त सुरवार घातलेला तो संभावित जॉकी! फुलपांखरासारखी अचपळ आणि क्रीडाकुशल अशी आपली कन्या पाहून तो वृद्ध वडीलही मंत्रमुग्ध झाला. ओहो! सूर्याच्या कोवळ्या किरणांत तुकतुकीतपणे तळपणारे तिचे ते विखुर केस आणि तो तिचा आखुड झगा—खरोखरीच किती सुदर दिसते ही! भरास आलेली जवानी आणि खेळखर वृत्ती याचा त्या देहीं संयोग पाहून त्या तिघांही तरुणांच्या मनांत—

*तृणाचें पाते। हालते डोलते वाते*
*यावरि तेज कसे रसरसते*
*जीवन नसातुनी थबथबते*
*यौवन सर्वांगी थयथयते*

ह्या कवनपंक्ती निनादूं लागल्या असतील. त्या नट-चंचळ युवतीच्या त्या वेळच्या लीलाविलासांत जडमूढानाही कवि बनविण्याची जादू होती. मग—

*सहज तुझी हालचाल मंत्रें जणुं मोहिते*
*सहज चालणेहि तुझे*
*सहज बोलणेंहि तुझे*
*सहज पाहणोंहि तुझें मोहनि मज घालते*

ह्या कधी तरी कानावरून गेलेल्या ओळींची त्या तरुणांना आठवण झाली असल्यास आश्चर्य कसलें ? ती पुष्पिताग्रा – हालचालीसरशीं मलपणारे तिचे ते मदनध्वज, स्वतः धुंद असून दुसऱ्यांनाही धुंद करीत आहेत पाहा ! ते पाहा, एका पाठोपाठ एक, तीन चेंडू तिनें वर भिरकावले, आणि ते परत झेलतांना लांबवलेले हात, पुढें गेलेला झोक, तो सावरण्याची सफाई, वर झालेली मान, डोळ्यांतली उत्कंठा, अचुक टिपण, आणि त्यांत दक्षपणानें बदल करण्यासाठीं क्षणोक्षणी करावी लागणारी धांवपळ व चपळाई – ही सारी कसरत किती आश्चर्यकारक आणि प्रेक्षणीय ! तिचे हे उत्फुल्ल स्वरूप आणि क्रीडालाघव वडिलांच्या आजवर कधींच पाहण्यांत आले नव्हतें. ती एकाद्या नाचऱ्या अनल–ज्वालेसारखी भासत होती. किंवा, त्या उद्यान–कोनांतील लताकुंजांत साक्षात् वनदेवीच प्रगटली आहे की काय असें वाटे. अथवा, पलीकडे पसरलेल्या सलील सरोवरांतून जलदेवताच नर अवतीर्ण झाली नाहीं ना, असाही संमोह उत्पन्न होत होता. घरांत हिंडता–फिरताना तिच्या अंगच्या चैतन्याचा इतका उन्मादकारी विलास कधींच प्रगट झाला नव्हता. ती घरी होती तोपावेतो घरगुती वातावरणाच्या जड-नीरसपणातच तिचे व्यक्तिमत्व लय पावत आले होतें. काठोकांठ भरलेल्या पेल्यांतून फेस वोसंडावा, असा हा तिचा ओतूं जाणारा चैतन्यसंचार, तिच्या सौंदर्याचा हा परमोत्कर्ष घरांत कधीच दिसून आला नव्हता. तिच्याकडे पाहात असतांना अशा तऱ्हेचे विचार त्याच्या मनांत येत होते. थोड्याच वेळापूर्वी, भल्या पहांटे, त्याला वास्तवतेचा जो हृदयविदारक प्रत्यय आला होता त्याचा त्याला कांही क्षण विसर पडला. आणि त्या नाचऱ्या अग्निशिखेव्यतिरिक्त त्याला कांहींच दिसेना. अखेर तिनें तिसराही चेंडू झेलला; आणि, त्या धावाधावीनें धाप लागली होती तरी देखील, हासत हासत जेव्हां ते तिन्ही चेंडू तिनें आपल्या उराशीं धरले

तेव्हां तिचें क्रीडालाघव पाहण्यांत रममाण झालेल्या तिघां तरुणांनीं टाळ्याच्या कडकडाटांत "शाबास, भले शाबास!" म्हणून तिचा जयघोष केला त्या जयजयकाराच्या घोषणांनीं त्याची मंत्रमुग्धता भंग पावली आणि त्याने त्यांच्याकडे एक क्रुद्ध दृष्टिक्षेपही टाकला.

"हे पाहा ते बदमाष." त्याच्या विचाराचे चक्र सुरू झाले. "तेच हे असावेत! पण ह्यांच्यापैकीं कोणता? ह्या त्रिकूटांपैकी तो कोणता? हे रिकामटेकडे, अजून नऊ नाही वाजले तोच कसें जामानिमा करून सज्ज झाले आहेत पाहा! दाढी उरकून, गुलाबपाण्याचे फवारे अंगभर शिंपडून... ' आमच्या सारख्यांना गुलामासारख कचेरीत रखडावं लागतं, ठिगळं लावलेले कपडे घालून मानेवर खडा ठेवल्याप्रमाणं, पाठीचा कणा मोडून जाईपर्यंत टेबलापाशी टाळकंफोड करावी लागते; नाहीतर, गिऱ्हाईक धुंडाळतां धुंडाळतां जोड्याची चाळण करावी लागते! कुणाला ठाऊक, ह्या खुशालचेंडू लेकांचे बाप देखील असेच हमालासारखे, कंबरेचा काटा ढिला होईपर्यंत कष्टत असतील! अलीकडची तरुण मंडळी खुशाल लहर लागेल तिकड आरामशीरपणानें भटक्या मारतात! ख्याली-खुशालींत उनाडक्या करीत दिवस घालवतात! चेहरे-मोहरे तेव्हढे पाहून घ्यावेत ह्यांचे! डोळ्यात काडीमात्र खंत नाही! बेशरमपणानें मिरवतात! भपकेबाज पोषाख करून डौलानं मिरवायचं आणि चवचाल छेलछबेल्यांना भूल घालायची,-काय अवघड आहे ह्यात अशा दिमाखखोरांना! ह्या टग्यांपैकी कोणता असावा तो! ह्यांच्यापैकीं कोणी तरी एकजण गत-यामिनीच्या गोड आठवणीनं मनांतल्या मनांत मिटक्या मारीत असेल आणि येणाऱ्या रात्रीच्या सुखस्वप्नांनीं जिभळ्या चाटीत असेल! कुत्र्यासारखी, मरमरेपर्यंत, मला त्याची चामडी लोळवायला मिळतील तर!"

दरम्यान, टेनिसच्या क्रीडांगणावरील त्या चौकडीचे त्याच्याकडे लक्ष

ले. कन्यकेनें हातांतल्या रॅकेटनें त्याला हासत हासत पालवले; आणि
ाघां युवकांनी त्याला शुभचिन्तनात्मक सकाळची सलामी दिली. उलट,
ानें कशाचीच बिलकुल दाद घेतली नाही, पण पुत्रीकडे मात्र रागाची
क नजर रोखली !

" फिदिफिदी हासतेय निलाजरी ! हास, हास ' माझ्याकडे पाहात
सतांना ह्या त्रिकूटापैकी एक जणाला अशाच मनातल्या मनांत निःसंशय
दगुल्या होत असतील ! स्वतांशीं तो म्हणतही असेल की 'हाच तो बावळट
ग्रापारी, घोरत पडलेला असतो रात्रीचा ' कांही पत्ता असेल कां याला ?'
ग म्हणावं, चोरा, मला सारं कांही माहीत आहे ' तुम्ही हासताय,
ावलाखालच्या धुळीसारखा कःपदार्थ समजताय मला ! माझी मुलगी,–तिची
गळीच गोष्ट निराळी ' सुंदर वस्त्रालंकारांनी सजलेली लावण्याची पुतळी
ाहे ती ! नुसती खूण करायचा काय तो अवकाश, की आलीच तुमच्या
ागं लागून ! तशीच तिची आई ! ती आतां कांही नवी नवरी नाही.
ण तिलाही हवाय नट्टापट्टा करायला ! तिच्या चेहऱ्यातली लहर आणि
हिरी नजर अजून कांही तशी मावळली नाहीं ! संयमाने स्वसंतुष्ट होऊन
ाहण्याइतकी कांही ती प्रौढा नाही,–तशांत खुषामत्यांचा घोळका सभोंवती
ासल्यावर तर मुळीच नाही ' तेव्हां, तुम्हां लुब्रयांच्याकडे काय दोष ?
हजासहजीं वश होण्याइतकी ह्या चंचल स्त्रियांचीच जर तयारी आहे तर
म्हाला दोष देण्यांत काय हांशील ! एका वृध्दाच्या अंतःकरणाला इकडे तडे
ात असले तर तुम्हांला काय त्याची एवढी पर्वा ' आणि ह्या बायकांनी,
ा बदफैली बायकांनी तरी त्याची कां बाळगावी एवढी क्षिती ! मजा
ारायची एवढंच काय तें तुम्हां सगळ्यांचं उद्दिष्ट ! तुमच्यासारख्याना गोळ्या
ाळून मारणं म्हणजे सुद्धां तुमच्यावर उपकारच करण्यासारखं आहे. खरं
हणजे, मरे–मरे–तो तुम्हांला चाबकांनी फोडून काढलं पाहिजे ! पण,

तुम्हाला काय बोल लावावा! सूड उगवायला तुमच्यावर जोपर्यंत कोणी धावून जात नाहीं, स्वतःचेंच वमन हुंगणाऱ्या कुत्र्याप्रमाणे, आपलीं आपल्याशींच जळफळणारीं माझ्यासारखीं माणसं जोंपर्यंत जगांत आहेत–छे, नामर्दा-प्रमाणं—अगदीं दीन भेकडाप्रमाणं जोंपर्यंत मी मूग गिळून आहे, जोपर्यंत मी त्या कार्टीच्या दंडाला धरून, फराफरा ओढून, तुमच्यापासून तिला बाजूला ओढून काढीत नाहीं, जोंपर्यंत मी एक अवाक्षरही न काढतां नुसता मुखस्तंभासारखा, तिच्याकडे पाहातच उभा आहे, तोंपर्यंत तुम्हांला नावं ठेवायची माझी लायकीच नाहीं! भ्याड, भेकड, नामर्द!"

संतापाचा पारा भयंकर चढल्यामुळें तो थरथरा कापूं लागला. म्हणून आधारासाठीं बाकाला टेकून तो उभा राहिला. पण दुसऱ्याच क्षणाला तो एकाएकीं ताडकन उठला, अन बागेतून, ठायीं ठायीं आडखळत, पण तडकाफडकी निघून गेला.

# ४

तिथून जो सोमनाथ निघाला तो सरळ एकठोक गांवांत शिरला. एका दुकानांत काचेच्या भव्य तावदानांत प्रवासी लोकांना लागणाऱ्या हरतऱ्हेच्या मामानाची आरास मांडली होती. ती पाहाण्यासाठीं तो तिथें थबकला. स्थलवर्णनाचीं पुस्तकें, स्थलसौन्दर्याचे चित्रसंग्रह, करमणुकीचें वाङ्मय, शर्टस्, पोलकीं, नेकटाईज, स्थानिक कारागिरीचे नमुने, क्रीडांगणासाठीं त्याचप्रमाणें मच्छीमारीसाठी लागणारीं जाळी, सुका मेवा, चॉकोलेट्स, इत्यादि अनेक वस्तूंची तिथें मांडामांड केली होती. त्या विविध–वस्तु–भांडारांतील एका जिनसावर त्याची नजर विशेष खिळून राहिली. तो जिन्नस म्हणजे डोंगर–चढणीसाठीं उपयोगी पडणारा, आणकुचीदार मायणीचा, जाडजूड, कणखर, गाठाळ सोटा !

" घाल टाळक्यांत त्या कुत्र्याच्या, अन् टाक जिवं मारून ! " विचाराच्या वावटळींत फिरून भ्रमूं लागलेल्या त्याच्या मनानें त्याला फूस दिली. जणुं कांहीं, हवी होती ती वस्तु सांपडल्यासारखा त्याला हर्षहि झाला. त्यासरशी तो दुकानांत घुसला आणि त्यानें तो सोटा खरेदी केला; मुठींत घट्ट धरून पाहिला. त्याला स्फुरण चढलें. हात शिवशिवूं लागला. दुबळ्याच्या हातीं शस्त्र लागलें म्हणजे वीरश्रीचा असाच संचार होतो त्याच्या अंगांत ! सोटा बळकट धरतांना त्याचे स्नायू तटतटून फुगले.

" घाल टाळक्यांत त्या कुत्र्याच्या अन् टाक जिवं मारून " स्वतांला संबोधून हे शब्द तो फिरून पुटपुटला. अभावितपणे अवसान आल्यागत छाती वर काढून तो चालू लागला. त्याची पावले झपाझप पडूं लागलीं. त्या सरोवराकांठची वाट त्याने परत धरली तेव्हां जवळजवळ पळल्यागतच त्याचीं पावले पडत होतीं. धापही लागली त्याला, पण ती जलदीच्या चालीपेक्षां रागाच्या आवेषानेच म्हणणे सयुक्तिक ठरेल.

तें शस्त्र हातांत बळकट धरून, तो दरवाजालगतच्या दिवाणखान्यांत येऊन पोहोंचला. तिथें अंधुक उजेड आणि त्यामुळेंच गारवाही पण होता. तिथे आपले प्रतिपक्षी आढळतील ह्या कल्पनेनें तो सभोवार पाहूं लागला. आणि, अपेक्षेप्रमाणें तें टोळकें—त्याची बायको, मुलगी आणि त्या दोघींना घेरून टाकणारे तें त्रिकूट तिथें त्याला दिसून आलें. एका कोपऱ्यांत, वेताच्या खुर्च्यांवर आरामशीर बैठक मारून, गवती नळ्यांतून सोडा-व्हिस्कीचे झुरके घेत घेत, थट्टामस्करीचे फवारे उडवीत, कालहरण चालले होतें त्यांचें !

" हाच का तो ? कां, हा तो ? " हातांतला सोटा एकेकाकडे रोखून तो आपली खात्री करून घेऊं लागला. " ह्यांच्यापैकीं एकाचा कुणाचा तरी कपाळमोक्ष केलाच पाहिजे आज ! पण, ह्यांच्यापैकीं तो बदमाश कोण ? "

त्याच्या प्रश्नार्थक नजरेचा अंतस्थ रोख लक्षांत न येऊन, आरुणी एकदम त्याच्याकडे धांवतच गेली.

" अखेर हे पहा आले बाबा ! कुठं होता इतका वेळ, बाबा ? आह्मी कित्ती कित्ती शोधलं तुम्हाला सगळीकडं ! बाबा, तुम्हाला एक जम्मत सांगायचीय ! ओळखा पाहूं ! हे जहागीरदारसाहेब आम्हाला आपल्या मोटारींतून दिलचंगा सागराच्या कांठाकांठानें फेरफटका मारायला घेऊन जाणार आहेत. " हें बोलत असतांना ती आपल्या बाबांना घुलवीत घुलवीत मेजापाशीं घेऊन आली. हा बेत पसंत असल्याबद्दल बाबा दोन शब्द बोलतील, निदान तसे दाखवतील अशी तिची अटकळ होती.

तिघे तरुण त्या वयोवृद्धाशीं हस्तांदोलन करण्यासाठीं उभे राहिले. म्हाताऱ्याचें अंग कांपूं लागलें. पण त्याची मुलगी त्याच्या डाव्या दंडाला लडिवाळपणानें खेटून उभी होती आणि तिच्या नाजूक हाताच्या स्निग्ध शीतल स्पर्शामुळें त्याच्या क्रोधाची उकळी दबली गेली. स्वप्नांत असल्या-प्रमाणे त्यानें त्या तिघां तरुणांशीं हस्तादोलन केलें, आणि हताशपणें खुर्ची घेऊन, आपल्या डबीतील चिरूट काढला व त्याचे टोक दांतांनीं खटकन् तोडून थुंकले. त्याच्या आगमनानें खंड पडलेल्या गप्पागोष्टींचा ओघ फिरून इंग्रजींत खळखळूं लागला.

आपल्या मानसिक व्यथेची परिस्फुटता न करतां, तो वृद्ध गृहस्थ अंगाचे मुटकुळें करून, तिथे बसून राहिला. चिरूटाचे टोक चघळतांना, तंबाखूचा तपकिरी मुखरस त्याच्या दांतांत साठूं लागला.

" कोण दोष देईल ह्यांना ? कोण दोष देईल ह्यांना ? " तो पुन्हा तार छेडूं लागला. " तिरस्कार करण्यालायक कोणी असेल तर तो मी आहे. ह्या तिघांपैकीं एकजण बदमाष आहे हें पक्कं माहीत असून, मींच ह्या तिघांशी

हस्तांदोलन केलं ! त्यांच्याच पगतीला बसूनही राहिलों आहे ! त्या हलकट माणसाला नेस्तनाबूद करायला मी प्रवृत्त कुठं होतोय ? उलट आदबीनं मीं माझा हात पुढं केला ! मला ते हसत असले तर त्यांत त्यांना काय बोल ? मला इंग्रजी येत नाहीं. आरुणी न् तिची आई ह्यांना हें माहीत आहे. पण त्यापेक्षां, मी इथं नाहींच असं समजून—मी मेलों आहे—मी गाढला गेलों आहे असं समजून ह्यांनीं आपली थट्टामस्करी पूर्वीसारखी उघड उघड चालू ठेवायला काय हरकत आहे ? ह्या दोघांना हें पुरतं माहीत असूनही, माझा बावळटपणा दिसून येऊं नये, चारचौघांत माझा मूर्खपणा प्रगट होऊं नये एवढ्यासाठीं तरी सहज एखादा शब्द ह्यांनीं माझ्याशीं बोलायला नको का ? पण मी त्याच्या खिजगणतीत नाहींच मुळीं ! किंबहुना मी एक आडगळ, लोढणं आहे त्यांच्या हिशेबीं ! माझी ह्यांना लाजही वाटत असेल ! आणि माझ्यापासून मन मानेल तशी पैशाची प्राप्ति होत नसती तर ह्यांनी मला आपल्या वाटेंतून कधींच दूर केला असता. पैसा, हा पैसा, सगळ्या अनर्थाचं अन् दुःखाचं मूळ हा पैसा ! ह्या पैशानं ह्यांना असं बिघडवून टाकलं आहे ! परमेश्वरी शापच आहे जणुं ह्या पैशाला !—ही माझी बायको किंवा ही माझी लेक—एका शब्दानं तरी माझ्याशीं बोलायची ह्यांची तयारी कुठं आहे ? गुलगुल गोष्टी करणाऱ्या ह्या चंगीभंगी टोणग्यांवर मात्र ह्यांच्या नजरा कशा खिळून राहिल्या आहेत ! बघा कशा खिदळत आहेत ह्या दोघीजणी,—जणुं कांहीं हे टोळभैरव प्रत्यक्ष गुदगुल्याच करीत आहेत ! अन् मी हें सारं, ह्यांच्या शेजारीं बसून, खपवून घेत आहे; एक अक्षरही समजत नसलं तरी ह्यांचं हसणं—खिदळणं—खेंकाळणं ऐकून घेत आहे ! माझ्या डोळ्यांदेखत ह्यांची सलगी चालू असतांना, ह्या चोरांना ह्या दंडुक्यानं झोडपून काढून घालवून देण्याऐवजी, ह्या टोणग्यांना मनगटानं गुद्दे लगावून—चांगली कणिक तिंबून हाकलून लावण्याऐवजीं, मी इथं बसून राहिलों आहे ! मीं

ह्यांचे सगळे थेर चालूं देत आहे, मुकाटयानं इथं बसून आहे, कांही प्रतिकार करीत नाहीं—हां, मीच भ्याड आहे, भेकड आहे, नामर्द आहे ! ”

सोमनाथाच्या डोक्यांत विचाराचे असे थैमान चालू असतांना, मध्येच तो बडा लष्करी ऑफिसर उठला, आणि आपल्या जवळची आगकाडी पेट-वून, त्याच्या चिरूटला लावण्याच्या इराद्यानें ( मराठी येत नव्हतं तरी त्या वृद्धासाठीं वाक्याची व्यवस्थित जुळवाजुळव करून ) म्हणाला “ आपली खुषी असेल तर मी...... ”

त्याबरोबर तो बेभान म्हातारा एकदम दचकला, आणि निःशंक मनानें विचारणाऱ्या त्या अम्मलदारावर संतप्त नजर रोखून पाहूं लागला. त्याच्या सर्वांगाचा क्रोधानें भडका उडाला. क्षणभर त्यानें आपला सोटाही सरसावला, पण लगेच, सोटयावरची पकड सैल पडली. आणि, दात–ओठ खात, तोंड वेगाडून, चवताळून म्हणाला—

“ हो, हो, माझी पूर्ण मुभा आहे ! ” त्याच्या आवाजाला प्रखर शस्त्राची धार होती, “ पूर्ण मुभा आहे कीं ! काय चाहेल तें करायला माझी तुम्हांला पूर्ण मोकळीक आहे ! जे जे म्हणून माझं इथं आहे तें तें सारं तुमच्या स्वाधीन आहे ! माझ्याशी आणि माझं म्हणून जे जे आहे त्या साऱ्याशीं मन मानेल तशी लगट करायला संकोच कशाला बाळगतां ? ”

तो अम्मलदार ह्या सरबत्तीनें एकदम दचकून मागे सरला. मराठीचे त्याचे ज्ञान यथातथाच असल्यामुळें त्याला त्या बुड्ढयाच्या बडबडींचा शब्दशः अर्थ कळला नाही. परंतु त्याच्या पिसाळलेल्या मुद्रेवरून सगळा भावार्थ स्पष्टपणे कळून चुकला. तो भयचकित होऊन, एकदम मागेच सरकला. माय–लेकीचा नूर खरकन् उतरला. ढगाळ आकाशात विजेचा चकचकाट आणि पाठोपाठ होणारा कडकडाट ह्यांच्या दरम्यान किंचितकाल गंभीरता असते, तशाच प्रकारची तिथे गंभीर स्तब्धता पसरून राहिली. मग अमळशानें, वातावरणांतला

ताण जरा ढिला पडला. सोमनाथाच्या हातांतला सोटा, बोटाची पकड सैल झाल्यामुळे, गळून पडला. चाबकाचे तडाखे खाल्लेल्या कुतरड्याप्रमाणें त्याची देहयष्टी आकुंचित झाली. मनांत माजून राहिलेल्या गोंधळामुळें, खुरटलेल्या झुडपाप्रमाणे त्याची अवस्था झाली. स्वताच्या धिटाईचीच त्याला भीति वाटली. आणि आरुणीनें, जणुं कांही घडलेचं नाहीं अशा आविर्भावानें पूर्ववत् गप्पा – गोष्टींना तोंड फोडण्याची चपळाई केली. वळवाच्या पावसानें ओढयाला अकस्मात पुराचा लोंढा यावा नि तो अल्पावकाशांतच ओसरून जाऊन फिरून पूर्वीचा झुळझूळ प्रवाह तेवढा उरावा—आभाळ देखील मोकळें व्हावें—त्याप्रमाणें, थोडयाच अवधींत तो मधला प्रकार पार विसरून गेल्याप्रमाणे, सर्व पूर्वीच्या रंगांत आले.

तो म्हातारा खालीं मुंडी घालून अलिप्तपणें बसून राहिला.—पेंगत असावा, असेंच कुणाला वाटलें असतें. त्यानंतर त्याच्याकडे कोणी लक्ष दिले नाहीं. गप्पागोष्टींच्या लहरी त्याच्या स्तब्धतेवरून फैलावत होत्या. लज्जा आणि मनोव्यथा ह्यांत गुदमरून गेलेल्या त्या मूर्तिमंत दैन्यासन्निध, मधून मधून हास्याचे बार उडत होते.

# ५

ते तिघे उठले; तशी आरुणीही पाठोपाठ तत्परतेनें उठली आणि आई ( वयपरत्वें लेकीइतका चलाखपणा नसल्यामुळें) तिच्यामागून उठली. संगीत शाळेकडे जाऊं या, असें त्यां तिघांपैकीं एकानें सुचविलें; आणि बाकीच्यांना ती कल्पना पसंत पडली, त्यांनीं लगेच होकार भरला. जवळच्या खुर्चीवर झोंपी गेल्यागत पडून असलेल्या त्या वयोवृद्धाचा मान राखण्यासाठीं त्याला स्वतंत्र रीत्या उठायला सुचवायला हवें आहे, ही अक्कल मात्र कोणाच्याच डोक्यांत आली नाहीं. रात्री झोंपेंत अंगावरचें पांघरूण बाजूला सरकलें असतां, गारठा लागून जसा झोपलेला इसम एकदम जागा होतो, त्याप्रमाणें, ती मंडळी तिथून निघून गेल्यावर त्या ठिकाणीं जी एकदम सामसूम झाली तिच्यामुळें तो भानावर आला.

प्रथम त्याची नजर गेली ती तिथल्या रिकाम्या खुर्च्यांवर. आणि त्या रिकाम्या खुर्च्यांवर त्याची दृष्टीं खिळलेली असतांनाच, शेजारल्या खोलींतील उद्दीपक संगीताच्या नादलहरी व त्यांतूनच मधून मधून उडणारे हास्याचे फवारे व परस्परांच्या प्रशंसेचे उद्गार त्याच्या कानावर आले. "एकंदरीत नाचरंग सुरू झाला म्हणायचा तिकडे ! फिरफिरून बेहोष होऊन एकमेकांना उल्लूप्रमाणे खेटून धिंगाणा घालायला हवाय ! संध्याकाळी नाच आहेच, मध्यरात्रीपर्यंत नाच चालतो आहेच, आणि आतां ध्या-दिवसाही नाचताहेत ! उडाणटप्पू लेकाचे ! बायकांना नादी लावायला नृत्य हे अमोघ अस्त्र आहे ह्यांचं ! "

मस्तकांत फिरून तिरस्काराची तिडीक उठतांच, सोटा उचलून घेऊन तो त्या दिशेकडे निघाला. दरवाजांत येऊन थडकल्यावर, तिथूनच तो त्याच्याकडे बघत राहिला. तो शिष्ट जॉकी पियानोशीं बसला होता. एकीकडे जोरजोरानें पियानो ठोकीत असतांना, त्या तालावर नाच कसा चालला आहे हे पाहतां यावें म्हणून त्या घडवंचीवर, अर्धवट मागल्या कलावरच त्यानें बूड टेकले होतें. आरुणी त्या बडया ऑफिसराबरोबर नाचण्यांत रंगून गेली होती. तिची आई, जरा जड पावलांची असल्यामुळें, त्या तुंदिल-तनु जहागिरदाराबरोबर मोठया कष्टानें ताल धरण्याची कोषिस करीत होती. सोमनाथाच्या दृष्टीला आरुणी आणि तिचा जोडीदार ह्या दृश्याशिवाय दुसऱ्या कशाशीच कर्तव्य नव्हतें ! तो तुकतुकीत शिकारी कुत्रा, तो झकपकीत अम्मलदार तिचा स्कंध—जणु कांहीं ती खास आपलीच मालमत्ता आहे अशा निःशंक भावनेनें—तिचा स्कंध हाती धरून नाचत होता; आणि आरुणी—संकोच व संयम ह्यांचें विस्मरण पडून—किति भावविवशतेनें त्याला बिलगली होती. हो, हाच तो इसम असला पाहिजे ! त्यांच्या अंगोपांगांच्या चलनवलनावरून, त्यांच्या निःसंकोच अंगलगीवरून त्यांची सलगी स्पष्टच होत आहे. गेल्या

रात्रींच्या त्यांच्या परिरंभणाचं गुपित त्यांच्या ह्या हावभावांतील गाढ उत्कटतेनें चांगलें उघडकीस येत आहे. हाच तो मनुष्य असला पाहिजे. त्यांच्या अर्धोन्मीलित तथापि धुंदकारलेल्या दृष्टींत, काल रात्रीं आस्वादलेल्या सुखोपभोगाच्या स्मृतीचे लेख झळकत असल्याचें वडिलाला दिसत होतें. ज्या चोरानें तिचा बाहू आतां नृत्याच्या मिषानें कवळला आहे त्यानेंच कालच्या रात्रीं ह्याहून गाढ आलिंगनांत तिला उराशीं आवळून धरली असेल ! प्रियकराच्या मिठींतून तिला ओढून काढायचा धीर करायच्या भावनेनें सोमनाथ आपोअप अधिक जवळ येऊन उभा राहिला. त्याच्याकडे कोणी लक्ष दिलें नाहीं. तिचा जोडीदार, तिला फूस लावणारा तो रंगेल जसा नाचवील तशी ती संगीताच्या आरोहावरोहाबरोबर, त्याच्या समवेत हेलकावे घेत होती. तिची मान मागे कलली होती. तिचे ओठ विलग झाले होते. ती धुंद झाली होती. संगीताच्या सुरसागरावर तरंगतांना तिला स्थलकालाचा विसर पडला होता. संतापातिरेकानें वेड लागायच्या बेताला आलेला आपला बाप, धापा टाकीत थरथरा कांपत उभा असून निखाऱ्या सारख्या लालभडक नजरेनें आपणाकडे रोखून पाहात आहे ह्याचीही तिला शुद्ध नव्हती. तिला स्वतः पलीकडे घुमून राहिलेल्या संगीताच्या चैतन्यानें प्रस्फुरित झालेल्या आपल्या भरज्वानींतील अवयवांच्या गोड शिरशिरीपलीकडे, कशाचेंही भान उरलें नव्हतें. हा तरुण आपली अभिलाषा बाळगीत आहे, अभिलाषेची मूक भाषा ह्याच्या सर्वांगांत संचरली आहे, ह्याचा निःश्वास आपल्या गालाला गोड फुंकर घालीत आहे, ह्या सर्व भुलावणीनें उचंबळणाऱ्या संवेदनांनी आपल्यालाही सुख वाटत आहे, त्या सुखास्वादाची भूक रोमरोमीं कहर उडवून देत आहे, त्या कहरांत—त्या उसळलेल्या ज्वाळेंत स्वतांची आहुती देण्याची–आत्मसमर्पण करण्याची हाव वाढत आहे, पण ह्या स्खलनशील प्रेरणेला आवर घालणें भाग

आहे—ह्याव्यतिरिक्त दुसरी कशाचीही तिला शुद्ध नव्हती. सोमनाथाला हें सारें कळून चुकलें—त्याच्या धमनी-धमनींतून माजून राहिलेल्या तुंबळ संग्रामामुळें त्याला हें सारे स्पष्ट कळून आलें होतें. नृत्याच्या पवित्र्यानुसार ती जेव्हां जेव्हां दूर जाई तेव्हां तेव्हां, तिची नि आपली कायमची फारकत होत आहे, असें त्याला वाटे.

अवचित संगीत समाप्त झालें आणि पियानोवर वाजविणारा जॉकी टुणकन उठून उभा राहिला. हर्षोत्फुल्ल मनानें तोंड भरून त्यानें त्यांची प्रशंसा केली.

"आतां, आम्हांला चान्स द्या कीं—माझी पाळी आतां" असें त्यानें आपल्या लष्करी दोस्ताला सुचवलें.

बाकीच्यांनींही यथोचित जयघोषानें आपली अनुमति जाहीर केली. नाचणाऱ्या दुकलींच्या ऐवजीं आतां तिथें एकच घोळका माजून राहिला.

तो बुड्ढा पुन्हां एकदां भानावर आला. मधें तोंड घालून बोलायची, व्यत्यय आणायची ही वेळ होती. आणि इतःपर निष्क्रिय राहणें, फालतू प्रेक्षकाप्रमाणें उगीच बघत राहाणें त्याला शक्यही नव्हतें. त्याची बायको नृत्याच्या व्यायामानें कांहींशी श्रांत झाली होती खरी; तरी पण समाधानाचा पेला कांठोकांठ भरून वाहात असल्याची साक्ष तिच्या मुद्रेवर दिसत होती. तीं त्याच्या समोरून, अंगावरून जाऊं लागली. त्याच्याही मनाचा ठाम निर्धार झालाच होता; तोंच ती समोरून जाऊं लागल्यामुळें त्या निर्धाराला क्रोधानें पंख फुटले. तो बुद्धयाच तिच्या वाटेंत आडवा झाला.

"माझ्याबरोबर बाहेर चल" हुकमी स्वरांत त्यानें तिला हटकलें. "तुझ्याशीं मला कांहीं बोलायचं आहे"

ती प्रश्नांकित मुद्रेनें त्याच्याकडे पाहात राहिली. ह्यावेळीं त्याच्या निस्तेज कपाळावर घामाचे थेंब डंवरले होते. त्यानें तिच्याकडे तिरपी नजर लावली

होती. 'नेमकी ह्याच वेळीं इतकी कसली निकड लागली आहे ह्यांना ? हा काय मेला त्रास ? रंगांत बेरंग !' अशा आशयाचे नकाराचे शब्द अगदीं तिच्या ओठांवर आले होते. इतक्यांत, त्याच्या त्या रौद्र अवताराकडे तिचें लक्ष गेलें आणि, थोडया वेळापूर्वी, गप्पा गोष्टी चालल्या असतांना त्यानें केलेला गडगडाट तिला आठवला. मोठया कष्टानें, तिनें आपले शब्द आंतल्या आंत दडवले, तेवढया वेळेपुरतें तिला नमतें घ्यावें लागलें.

" क्षणभर माफ करा अं " त्या तरुणाकडे वळून ती आर्जवी आवाजांत म्हणाली.

" ह्यांची मात्र ही क्षमा मागते, परवानगी मागते " सोमनाथाच्या क्रोधाची स्वगत भाषा सुरू झाली. " मला तिथं एकट्याला सोडून जातांना मला नाहीं कुठें विचारलं तें ? तेव्हां नाहीं जरूर वाटली ! मी जणुं कांहीं दारांतलं एक श्वान, ह्यांच्या दरवाज्यांतलं पायपुसणं, अशा रीतीनं माझ्याशीं वागणूक अं ! बरोबर आहे, त्यांचा काय त्यांत दोष ? जोंपर्यंत मी हें सारं खपवून घेत आहे तोंपर्यंत त्यांना काय बोल लावायचा ? "

नवरा नि बायको—फक्त दोघेच जण ! बाजूला येतांच ती भिवया चढवून उभी राहिली. शिक्षकांपुढें जसा विद्यार्थी तसा तो तिच्यापुढें दिसत होता. त्याचे ओंठ थरथरूं लागले.

" हं, काय काम आहे ? " अखेर तिनेंच विचारलें.

" मी हें चालूं देणार नाहीं ! म–म–मला हें ख–खपणार नाहीं ! " संतापानें त्याची जीभ बोलतांना अडखळूं लागली. " माझी मनाई आहे; ह्या लोकांशीं तूं संबंध ठेवतां कामा नये ! "

" कोणचे लोक ? " अपमानाच्या चिडीनें तिनें विचारलं. हें विचारतांना, आपले पतिराज कोणत्या लोकांबद्दल म्हणत आहेत, हें आपल्या ध्यानांतच आलें नाहीं अशी तिची बतावणी होती.

" तो, आंत घोळका जमला आहे तो " असें म्हणत, मानेच्या हिसड्यानें त्यानें संगीत–शाळेचा निर्देश केला. " हें मी मुळींच चालूं देणार नाहीं ! "

" पण कां नाहीं तें तर मला कळूं दे "

" हीच ती तुझी नेहमींची उलटून विचारण्याची खोड ! " निर्घृणपणे तो बोलत होता. " जसा कांहीं हिच्या घरचा मी कामाठी ! " बोलतां बोलतां त्याचा आवाज चढूं लागला. " आहेत, तशीच कारणं आहेत. अगदी बलवत्तर कारणं आहेत. हें जें चाललं आहे तें मला मुळींच खपणार नाहीं. आरुणीला देखील ह्या लोकांत तूं मिसळूं देतां कामा नयेस ! बजावून ठेव तिला. हे मी निक्षून सांगतों आहें ! मला जें कांहीं माहीत आहे तें तुला कुठं सांगत बसूं ?—सांगण्यासारखं नाहीं तें ! "

" मला जें रास्त दिसेल तें मी करीन " तिनेंही तितक्याच आढ्यतेनें उत्तर दिले. " माझ्या कल्पनेप्रमाणें, ते सारे सद्‍गृहस्थ आहेत, चागले कुळशीलवान् आहेत ! निदान आपल्या घरी रोज ज्यांची वर्दळ असते, आपणांला ज्यांचा रोजचा सराव आहे त्यांच्यापेक्षां तरी खासच सभ्य नि घरंदाज आहेत हे लोक ! "

" पुष्कळ घरंदाज आहेत हे ? हे उडाणटप्पू, हे...... " रागानें त्याच्या तोंडून शब्द फुटेना. जमिनीवर पाय आपटून, तो फिरून म्हणाला " मी हें मुळीच चालून देणार नाहीं ! सक्त मनाई आहे माझी ! समजलं कां मी काय म्हणतों तें ? "

" नाहीं ! मला कांहीं समजलं नाहीं ! " तिनें थंडपणानें उत्तर दिले. " आरुणीच्या सुखाच्या आड मीं कां यावं तें मला कळत नाहीं ! "

" तिचं सुख ! तिचा आनंद ! " कोणी तरी अचानक घाव घातला म्हणजे जसा तोल जातो तसा तो भेलकांडूं लागला. त्याचा चेहरा लालबुंद

झाला. चांचपडत त्यानें सोटा घट्ट पकडला. नंतर, आपला क्षोभ जरा कह्यांत आणून, तो आणखी तिच्या जवळ जाऊन तिला कळवळून सांगूं लागला, "तूं गैरसमज करून घेते आहेस. ह्यांत मला का कांहीं मिळवायचं आहे? माझं एवढंच मागणं आहे (अन् उभ्या आयुष्यांत तुझ्याजवळ कांहीं मागणी केली असेल तर ती ही पहिल्यांदा! तेव्हां माझं म्हणणं एवढंच आहे) की, आपण इथून तावडतोब निघून गेलं पाहिजे! कुठं जायचं हा मोठासा प्रश्न नाहीं, त्याची मला एवढी पर्वा नाहीं! महाबळेश्वर, नाहीं तर उटकमंड, नाहीं तर पचमढी—कुठंहि जाऊं! हें काय, किंवा त्यांतलं एकादं काय,—सगळीं ठिकाणं सारखींच! तूंच ठरीव कुठं जायचं तें,—पण आजच्या आज आपण इथून निघालंच पाहिजे. मला हें इतःपर मुळीच सहन होणार नाहीं!"

"आज!" सहानुभूतिशून्य अंतःकरणानें, भिवयांना मुरड घालून तिनें विचारलें "आज निघायचं? काय, म्हणतां काय तुम्ही हें? केवळ तुम्हाला हे लोक आवडत नाहीं म्हणून? पण तुम्ही त्यांच्यांत मिसळून वागायची जरूरी आहे कुठं?"

आर्जवीपणानें पुढें हात करून तो उभा राहिला.

"मला हे सहन होत नाहीं. मी सांगतों, माझं ऐक! हें सहनच होत नाहीं मला. कां म्हणून, तें मला विचारूं नकोस. पण मला सहन होत नाहीं म्हणून, ज्याअर्थी मी तुला सांगत आहें त्याअर्थी, तूं विश्वास ठेव. फक्त ह्या खेपेला, एकदां तरी माझं ऐक! निदान मला बरं वाटावं एवढ्यासाठीं तरी ऐक—फक्त ह्या वेळेपुरतं!"

शेजारच्या नृत्यमंदिरांतून फिरून पियानोचे सूर येऊं लागले. तिची इच्छा नसूनही, त्याच्या काकुळतीनें तिचें चित्त द्रवलें. किती केविलवाणे दृश्य दिसत होतें. तो ठेंगू, स्थूल बांधा; फेंफऱ्याचा झटका येऊन ओसरल्या-

सारखा दिसणारा त्याचा फसफसणारा चेहरा; ते संत्रस्त डोळे; आणि अर्धवट उचललेले, कंप सुटलेले हात;—कींव येण्यासारखीच त्याची अवस्था झाली होती. पण इतक्यांत, त्याचा बेंगरूळपणा पाहून, तिच्या अंतर्यामीं तात्पुरती उचंबळून येऊं लागलेली दयेची लाट परत मुरडली.

"पण हें निरर्थक आहे तुमचं म्हणणं" निश्चयात्मक स्वरानें तिनें उत्तर दिलें. "आजच्या तिसऱ्या प्रहरच्या सहलीचं आमचं कायम ठरलं असून, आम्ही कबूली देऊन बसलों आहों. तसंच, उद्यां देखील इथून निघतां यायचं नाहीं,—अन् तीन आठवड्यांच्या करारानं ह्या खोल्या भाड्यानं घेतल्या असतांना? इतका बावळटपणा कां म्हणून पत्करावा आपण? इथून मुक्काम हालवायला मला कांहीं कारण दिसत नाहीं; तेव्हां मी नि आरुणी इथंच राहूं—"

"मी निघून गेलों तर तुझी हरकत नसेल ना? बाकी, मीं इथं राहिल्यानं तुमच्या चैनीत अडथळा मात्र यायचा!"

प्रखर धारेच्या ह्या उपरोधात्मक उद्‌गारानें त्यानें खटकाच तोडला. आपले खांदे फुगवून तो ताठ उभा राहिला. त्याच्या मुठी आवळल्या गेल्या व कानशिलांत सणसणा घाव बसूं लागले. त्यावेळीं तो तिला मारायला धावून जाणार कीं काय, असेंच कुणाला वाटलें असतें. पण झटकन् तोंड फिरवून, ताडताड पावलें टाकीत आणि खाडखाड जिना चढून, जणूं कांहीं पाठीमागें समंध लागला आहे अशा तांतडीनें तो तिथून चालता झाला.

# ६

सोमनाथ धावत–पळत जिना चढून आला. एकठोक आपली खोली गांठायची एव्हढाच त्याचा उद्देश होता. रागाच्या भरांत आपल्या हातून आततांईपणाचें कांही कृत्य घडूं नये, आपला राग लगामीं आवरतां यावा, एव्हढ्यासाठीं खोलीचा आश्रय घेणे हाच एक मार्ग होता. वरच्या मजल्यावर असलेल्या आपल्या खोलींत तो येऊन पोहोंचला न पोहोंचला तोंच पित्ता-शयांत भयंकर कळ उठली. चेहरा एकदम फटफटीत पडला, आणि आधारा-साठीं भिंतीला टेकून तो उभा राहिला. किती भयंकर वेदना होत होत्या ! तोंडून किंचाळी फुटूं नये म्हणून त्यानें दांत घट्ट आवळून धरले.

हा काय प्रकार आहे तो त्याला ताबडतोब पूर्णपणें कळून चुकला. पित्ता-

शयाचा बिघाड! अलीकडे वारंवार भयंकर झटके येऊं लागले होते ह्या पित्तशूळाचे! त्यांपैकींच हा एक आहे, हें त्याला तेव्हांच उमगलें. इतका प्राण कासावीस करणारा झटका मात्र पूर्वी कधींच आला नव्हता.

" जिवाचा संताप करून घ्यायचा नाहीं अं!" हे पथ्य पाळण्याबद्दल डॉक्टरानी त्याला पूर्वीच बजावून ठेवलें होतें. आज ही कळ उठतांच त्याला डॉक्टरांनीं दिलेल्या ह्या धोक्याच्या सूचनेची आठवण झाली.

" संताप करून घ्यायचा नाहीं!" मनांतल्या मनांत त्यानें ह्या सूचनेची उजळणी केली. " सांगणं सोपं आहे! पण संताप टाळणं कसं शक्य आहे ह्या थरावर... ? हाय! हाय!"

शूळ इतक्या जोरानें उठला होता कीं हातापायांची फडफड करून विव्हळल्यावांचून त्याला राहवेना. कसाबसा तो स्वतःच्या खोलीपर्यंत फरफटत आला आणि पलंगावर धाडकन् अंग टाकून देऊन, तो उशी चावूं लागला. बिछान्यावर आडवा झाला तेव्हां कुठे वेदनांची तीव्रता किंचित् कमी झाल्यासारखी वाटूं लागली. गरम कपडा गुंडाळून, औषधाचे चार थेंब घेतले म्हणजे लवकरच बरे वाटेल, ह्या सांगीची त्याला याद आली. पण औषध राहिले पलीकडे निजायच्या खोलींत; आणि तें आणून द्यायला तर जवळपास कोणीच नाहीं! इतकेच काय, पण उठून घंटेचें बटन दाबायला हात लांब करायचेंही त्याला अवसान नव्हतें.

" कोऽणी नाहीं माझ्या मदतीला! एकाद्या झटक्यांत मी असाच एकलेपणीं टाचा घासून प्राण सोडणार! केवळ पित्ताशय–अश्मरीपेक्षां आणखी कांहीं तरी बिघाड झालेला दिसतोय! भरत आली आतां आपली घटका! धन्वंतरीचा किंवा ह्या हवाशीर ठिकाणाचा मला आतां कांहीं उपयोग नाहीं! मृत्यु मला पोखरीत आहे! आयुष्याचीं आणखी कांहीं वर्षें बाकी असलीं, तरी तें खरंखुरं आयुष्य नसून जिवंत मरणच म्हणायचं! तसं पाहिलं तर,

खरंखुरं आयुष्य मला कधीं लाभलं होतं, नाहीं तरी ? स्वतःसाठी जगलो असें जीवित......माझ्या आयुष्याची इतिकर्तव्यता काय ? पैसा ओढून आणणं; बाकी कांहीं नाहीं ! दुसऱ्यांच्या डोबलावर घालायसाठीं पैसा; आणि तो पैसा कमावून माझ्या काय पदरांत पडलं ? मला बायको करायची इच्छा झाली ! ही वधू मला सांगून आली, आणि तिच्या पोटीं मला कन्यारत्नाचा लाभ झाला. आम्ही नवराबायको वर्षानुवर्षें इतके एकदिलानं नांदलो की दोन देहांत एकच आत्मा असल्यासारखं वाटलं. खाल्लों, प्यालों, हिंडलों–फिरलों, निजलों–एका खोलीत एकाच शय्येवर एकाच हवेंत श्वासोछ्वास घेतले; इतकी एकरूपता आली होती आमच्या जीविताला ! मग, आतांच तिला असं काय लागिर झालं ? असा कां तिच्यांत बदल झाला ? आज, तिच्या चेहऱ्याकडे बघत असतांना, मला माझ्या अर्धांगीची ओळख पटूं नये ? तिचा आवाजही ओळखीचा वाटेनासा झाला आहे ! जणुं कांहीं, मी कोणी तरी तिऱ्हाईत आहे, अशा रीतीनें ती माझ्याशी बोलते. माझ्या भावना, माझे विचार, माझं सुखदुःख जाणून घ्यायची तिला काडीमात्रही इच्छा नाहीं. वर्षानुवर्ष ती माझ्यापासून दूर दूर होत चालली आहे ! मला मुलगी आहे— अगदीं माझ्या रक्तामांसाची ! ती जेव्हां जन्माला आली तेव्हां मला वाटलं " आज माझा पुनर्जन्म झालाय. माझ्या व्यक्तिवाचक शारीरिक जीविता-पेक्षां अधिक सुखकर आणि उज्ज्वल असं नवीन आयुष्य मला मिळालंय ! आतां मी सर्वांशांनीं मरून जाणार नाहीं ! ती ही माझी कन्या ! रात्र होतांच परक्याच्या बाहुपाशांत जाऊन पडते...... ! अरेरे, जसा मी एकलकोंडाच आयुष्य कंठित आलो, तसाच अखेर एकलेपणांतच मृत्यूच्या दाढेंत जाणार ! इतरांच्या दृष्टीनं, मी कधींच मृत्यु पावल्यासारखा आहे ! देवा ! देवा ! असा मी हताश एकाकी पूर्वी कधीच नव्हतों ! "

त्याचें शारीरिक दुःख कांहीं वेळ भडकत असे, तर मधेच जरासें सौम्य

होई; पण मनोव्यथेला मात्र उतार मुळीच नव्हता. विचाराच्या ज्वाला इतक्या धगधगीत झाल्या होत्या कीं त्यांच्या दाहकतेपुढें पित्ताशयांतला शूळ कांहींच नव्हे. खरें म्हणजे, त्यानें डोक्यांत विचारच येऊन द्यायला नको होते! पण तसें कुठलें व्हायला? कोट–जाकिटाचीं बटणं काढतांना देखील क्रोधावेशानें त्यानें हिसकाहिसकी केली! त्याचें डळडळणारे पोट शर्टखालून खालीं–वर होत असलेलें दिसत होतें. त्यानें दुखरा भाग हातानें दाबून धरला होता.

"ह्या दुखऱ्या भागाव्यतिरिक्त 'माझं' असं म्हणण्याजोगं माझ्यापाशीं काय राहिलं आहे? ह्या जगांत फक्त हा आजार आणि मृत्यु एवढीच काय ती माझी मिरास! घर, दार, बायको, पोरगी, धंदा – हीं सारीं आतां असून नसल्यासारखींच! प्रत्यक्षांत जर कांहीं असेल तर ही माझ्या-बोटाखालची जागा. जिथं कळा लागल्या आहेत ती ही जागा! बाकीचा सारा पसारा मूर्खपणाचा, फोल, भ्रामक, अर्थशून्य! माझ्या देहीं जें दुःख ठसठसतें आहे तेंही माझा मीच भोगणार! माझ्या मनीं–मानसीं जें खुपत आहे त्याचाही दुसऱ्या कुणाला उपसर्ग नाहीं!

*कळा ज्या लागल्या जीवा। मला कीं ईश्वरा ठाव्या*
*कुणाला काय हो त्यांचें? कुणाला हाय सांगाव्या*
*उरीं या हात ठेवोनी, उरीचा शूल का जाई*
*समुद्री चौकडे पाणी, पिण्याला थेंबही नाही।*

आरुणी आणि तिची आई ह्या इतःपर मला पारख्या झाल्या आणि मीहि त्यांना आतां पारखा झालों! एकाकी, मानवी जीवित किती एकाकी आहे! ज्याचा तो! ह्या एकलेपणाची इतकी सर्वतोपरी जाणीव मला पूर्वी झाली नव्हती! पण आज, जेव्हां असा इथं एकटाच पडलों आहे, मृत्यु माझी

घटका केव्हां भरते म्हणून वाट पहात आहे, पासष्टी उलटून गेल्यावर, ' शेवट ' अगदीं निकट येऊन ठेपल्यावर, आणि जेव्हां माझ्या घरांतली बायका—मंडळी नाचरंगांत आणि धांगडधिंग्यांत मश्गुल झाली आहेत, तेव्हां मला कळून येत आहे कीं कृतज्ञतेचा एक शब्दही बोलायची ज्यांची इच्छा नाहीं अशांच्यासाठीं मीं माझी हयात वेचली ! तेव्हां मला कळून येत आहे कीं स्वतःसाठीं आयुष्यांतली एक घटकाही मीं कधीं खर्ची घातली नाहीं !

*तटातट् काळिजाचे हे तुटाया लागती धागे*

पण, माझ्यासाठीं जर त्यांना कांहींच वाटत नाहीं, तर मीं तरी त्यांच्या विचारानं जिवाची तडफड कां करून घ्यावी ? त्यांच्या सहानुभूतीची याचना करण्यापेक्षां, एकटंच मरून गेलेलं काय वाईट ? काय कर्तव्य आहे आतां मला त्यांच्याशीं ? मी त्यांचा कोण, अन् त्या कोण माझ्या ? "

वेदनांचा भर हळूहळू ओसरूं लागला. जोरजोरानें पोट दाबणारा, पोटांतील आंतडीं पिळवटून काढणारा हात आतां सैल पडूं लागला. म्हणण्यासारख्या चमका आतां मारत नव्हत्या; तरी पण अस्वस्थता कायम होती. अजूनही आंत कुरतडल्यासारखे वाटत होतेंच, पण त्याची धार बोंथट झाली होती. तो डोळे मिटून स्वस्थ पडला होता; जणुं कांहीं, बारकाईनें आपली अवस्था निरखून तपशीलवार नोंद घेत होता तो. इतका वेळ गिरमिटासारखें जे जिव्हारीं भोंसकत चाललें होतें, त्याची प्रखरता आतां जाणवत नव्हती. पण तें थांबलें होतें असें मात्र नव्हे, त्याची क्रिया चालूच होती. हळूहळू, अगदीं हळूहळू, तें तळापर्यंत ठाव घेऊन, त्याचा निकाल लावून टाकावयाच्या उद्यो-गांतच होतें. कसली तरी खाई पेटली असून तीमध्यें त्याचा सर्व जीवनप्रवाह, जें जें म्हणून त्याला प्यार होतें तें तें सारें, गडप होत होतें, धुपूं लागलें

होतें, व लवकरच भक्तास उदासीनतेच्या कोळशावांचून त्याच्या हातीं कांहींही लागणार नव्हतें. निश्चल पडल्या पडल्या गतायुष्याची अशी उजळणी चालली असतांना, " आपली गत तरी काय होणार ? परिसमाप्ति ? हां, कशाची तरी परिसमाप्ति होणार खास ? पण कशाची ? " अशा रीतीनें, त्याची वृत्ति अन्तर्मुख बनून, ह्या प्रश्नाची उत्तरें शोधूं लागली.

हळूहळू, अगदीं मुंगीच्या पायानें, त्याचे हृदय खचूं लागले.

* * *

खोलींत उजेड अर्धवट होता. सोमनाथ डोळे मिटून पडला होता. तो अर्धवट जागा होता. तरी पण स्वप्नसाम्राज्यांत तो बुडत चालला होता. अर्धवट झोप व अर्धवट जागृति ह्यांच्या सरमिसळ अवस्थेत त्याला विचित्र आभास होत होता. केव्हां तरी नकळत वार लागून, कुठे तरी खोल जखम झाली आहे, ती आतां दुखत नाहीं. पण तिच्या व्रणांतून कसला तरी स्राव चालला आहे.—जणूं कांहीं ह्या अदृश्य रक्तस्रावानें आपला अंत होत आहे. त्याचा ओलसरपणा आणि कोमटपणा कळून येत आहे; पण त्यापासून वेदना होत नव्हत्या, इतका तो क्षुण्ण आणि संथ आहे. थेंब–थेंब, थेंब–थेंब ( उष्ण अश्रु ओघळावेत त्याप्रमाणे ) त्याची धार लागली असून, प्रत्येक थेंब आपल्या हृत्कोषांत पडत आहे. तो विचित्र स्राव, खोल–खोल दडलेलें आपलें हृदय शोषून घेत असून, त्याचा यत्किंचितही आवाज होत नाहीं. एकसारखे शोषण चालल्यामुळें हृदय स्पंजाप्रमाणे हळू हळू जड होत आहे, फुगत चाललें आहे आणि फुगतां फुगतां उराच्या आकुंचित पेटींत दाटूं लागलें आहे. त्याला असाही भास झाला की, तें भर-लेलें – तुडुंब भरून चाललेलें हृदय हळुहळू घसरूं लागलें आहे. त्यामुळें शिरांना ताण पडत असून, स्नायू तुटले जात आहेत.

*तटातट् काळिजाचे हे तुटाया लागती धागे !*

त्याचा आकार आणखी फुगत चालला असून, स्वतांच्या भारानें तें खालीं खालीं चाललेलें आहे. आतां तर ( अग आई ग ! काय ह्या कळा ! ) सर्व पाशांतून तें मोकळें होऊन – हिसकाहिसकीशिवाय सर्व तंतूंतून सुटून खालीं जाऊं लागलें आहे – देठापासून तुटलेल्या फळाप्रमाणें किंवा कोसळणाऱ्या दगडाप्रमाणें धपकन् नव्हे, तर भिजलेल्या स्पंजाप्रमाणें किंवा पाण्यांत बुडणाऱ्या कपड्याप्रमाणें तें अगदीं संथपणें खालीं खाली जाऊं लागले आहे – कुठेतरी – आपल्या शरीराबाहेर – खोल खोल रसातळाला चालले आहे – अनंत आणि अफाट अंधारांत – शून्यांत विलीन होत आहे. उलट, मूळ ज्या ठिकाणी हें उबदार आणि स्पंदनशील हृदय होतें त्या ठिकाणीं एकाएकी सारा मामला थंडगार झाला असून, अंगावर शहारे आणणारा भयानक रितेपणा तिथे आ वासून राहिला आहे. काहीं धडधड नाही कीं ठिबकणे नाहीं ! सारे कांहीं निपचित पडले आहे – मृतप्राय झालें आहे. [ अशा रीतीची एकंदर उलथापालथ झाली असून आतां प्रत्यक्षांत जे उरलें आहे तें काय आहे ? तर ] एक प्रकारची, जिची कल्पनाही करवत नाहीं अशा प्रकारची, अस्तित्वहीनता आली आहे. आणि जशी एकादी रिकामी ( अर्थात् अंधारी ) शवपेटिका असते, तसे नुसतें थडथडणारे उराचें खोके त्या शून्यतेभोवती राहिले आहे.

* * *

निद्रा व जागृति याच्या संधिकालांत अनुभविलेला हा स्वप्नमय भास, सोमनाथाला इतका खराखुरा वाटूं लागला कीं भानावर येताच, आपली हृदयक्रिया खरोखरीच थंड पडली नाहीं ना, हे पाहण्यासाठीं त्याचा हात आपोआप डाव्या छातीकडे वळला. परमेश्वराची खैरच म्हणायची कीं

त्याच्या हृदयाचे मंद आणि लयबद्ध ठोके त्याच्या हाताला जाणवले. त
देखील, त्या अर्धवट तंद्रींतील तो भ्रम त्याला दूर करतां येईना. हाता
लागणारे स्पंदन हें केवळ पोकळींत चाललें असून आपलें हृदय सर्व
लुप्त झालें आहे, हा जो त्याचा ठाम ग्रह झाला होता तो त्याला पुस
टाकतां येईना. कारण ( आश्चर्य असें कीं ) आपण व आपलें शरीर ह्यांत
संबंध ढिले पडले आहेत असें त्याला वाटूं लागले होतें. त्रास व्हाय
व्यथा नाहीं; डोक्याचें भजें व्हायला गतायुष्याच्या पराण्या नाहींत ! क
त्याच संवेदना नाहीत ! जणूं कांहीं, शिलाखण्डांत त्याचें रूपान
झालें होतें.

" हा काय प्रकार आहे ? काय, झालं तरी काय मला ? थोड्य
वेळापूर्वी मी किती दारुण वेणा देत होतों ! शिर न् शिर पिळवटून निघा
माझी ! अन्, इतक्यांत हा काय चमत्कार झाला ! "

नुकतेंच आभासात्मक जें दृश्य पाहिलें त्याच्या खरेखोटेपणाच्या सा
कतेनें, त्यानें फिरून आपल्या अंतरात्म्याला हे प्रश्न केले. पण तो भ
होत असतांना झालेली व्याकुलता आतां विरून गेली होती ! त्यां
कोणतीच बाब मागें शिल्लक राहिली नव्हती ! कांहीं खुपत नव्हतें कीं क
ठिबकत नव्हतें. ज्याचा गाभा अग्नींत होरपळून निघाला आहे अशा वृक्षा
ढोलीप्रमाणें त्याचें आन्तरिक जीवन आतां शून्यवत् झालें होतें ! तो कध
मृत्यु पावला असावा, निदान निम्मा शिम्मा तरी ! त्याची कुडी म्हण
केवळ कलेवर उरलें होतें ! आपल्या हातानें आपल्या शरीराला स्पर्श क
रायचें देखील त्याला भय वाटूं लागलें.

# ७

*हर्ष–खेद ते मावळले*
*हास्य निमाले*
*अश्रु पळाले,*
*कण्टक शल्यें बोथटली*
*मखमालीची लव वठली,*
*कांही न दिसे दृष्टीला*
*प्रकाश गेला*
*तिमिर हरपला*

अशी त्याची आन्तरिक अवस्था झाली. आणि त्या अवस्थेवरच सगळें

चित्त केंद्रित झाल्यामुळें, तासामागून तास किती गेले तेंही त्या वृद्धाच्या ध्यानांत आलें नाहीं. प्रार्थनामंदिराच्या घड्याळांत वेळोवेळी पडलेल्या ठोक्यांचे प्रतिध्वनि, समोरच्या तलावांतील जलपृष्ठावर परिवर्तित होऊन त्याच्या खिडकींतून आंत आले होते; पण ते त्याच्या कानांत शिरले नाहींत. रात्र पडून किती तरी वेळ झाला होता. आणि काळोख सर्वत्र इतका पसरला होता कीं ती उघडी खिडकीही त्यांत बुजून गेली होती. पण काळोख पडूं लागलेलाही त्याच्या नजरेला आला नाहीं. कारण आता त्याची नजर फक्त अंतर्यामीं भरलेला काळोख न्याहाळण्यासाठीच होती. त्याचप्रमाणे त्याच्या कानांनाही अंतर्यामीं भरून राहिलेल्या स्मशानशांततेचा कानोसा घेण्यापलीकडे कांहींही ऐकूं येणार नव्हतें.

अखेर, त्याला बाहेरच्या जगाची एकदांची जाग आली. पलीकडच्या खोलीत पिकलेले हंसे त्याला ऐकूं आले. त्या खोलीचे दार सताड उघडे असल्यामुळें, तीमधील प्रकाशाचा झोत बाहेर पडला होता.

" माझी बायको ! आणि आरुणी ! क्षणभरांत इकडे येतील आणि मला असा अस्ताव्यस्त पाहून, उगीच प्रश्न विचारून भंडावून सोडतील " अशा विचारानें त्यानें चटचट आपल्या जाकीटाचीं व कोटाची बटणे घातलीं. " पित्तशूळ उठला होता हे त्यांना सांगून करायचंय काय ? त्यांना काय होय त्याचं ? त्यांचा संबंध काय ? "

पण बायको किंवा आरुणी ह्यांपैकीं कोणीच त्याच्या खोलीकडे फिरकली नाही. त्या दोघीजणी आपल्याच धांदलीत दंग होत्या. भोजनाची तिसरी घंटा घणघणत होती. शक्य तितक्या चपळाईनें त्यांना कपडे बदलायचे होते. अर्धवट उघड्या दारांतून त्याला त्यांच्या तयारीची चाहूल लागत होती, अंदाज करतां येत होता. कपाटाचे खण ओढल्याचे आवाज त्यानें ऐकले. त्या दोघींनीं आपल्या अंगठ्या संगमरवरी मेजावर काढून ठेवल्याचा किणकिण ध्वनि

त्याच्या कानावर आला. पायांतल्या सपाता जमिनीवर पडल्याचा आवाजही त्यानें हेरला. एकीकडे तयारी चालू असतांना, त्यांचें एकमेकींशीं दरम्यान बोलणेंही चालले होतें. त्यांचा प्रत्येक शब्द त्याला ऐकू आला. प्रथम बोलणें निघाले सहलींतल्या अनेक गमतीबद्दल. मग, बरोबर आलेल्या तरुण सोबत्यांबद्दल बोलून झालें. चालू असलेल्या तयारीबद्दलही मधून मधून किरकोळ किलबिल होत होतीच. शेवटी, त्याचे नांव निघालें.

"आज काय, झालंय तरी काय, बाबांना असं?" आरुणीनें आश्चर्य व्यक्त केले.

लाडक्या लेकीला दिवसाकांठी वडिलांची, इतक्या उशीरानें कां होईना, आठवण झाली म्हणायची !

"मला म्हणशील तर कांहीं माहीत नाही." (अंगावर चढलेलें झुरळ झटकून टाकावे त्या तऱ्हेनें) आईनें तिचा प्रश्न ह्या उत्तरानें उडवून लावला. त्याचे नुसतें नांव काढण्यानेही तिच्या कपाळाला आठी पडली. "मला वाटतं की, बहुतेक खाली वाचनालयांत बसून वर्तमानपत्रातला 'नाणेबाजार' नि 'तेजीमंदी' ह्यांचे पारायण चाललं असेल ! तेव्हढाच काय तो त्यांचा छंद ! मला नाहीं वाटत, कधी ह्या सरोवराकडे देखील त्यांनीं डोळे भरून पाहिलं असेलसं ! त्याना हे ठिकाणच मुळी पसंत नाही; दुपारीं जेवायच्या पूर्वीच मला म्हणत होते. त्यांच तर म्हणणं होतं की आजच्या आज आपण इथून निघायचं !"

"आजच्या आज निघायचं म्हणत होते? का म्हणून?"

"कुणाला ठाऊक? त्यांचं त्यांना माहीत ! कां न् कशासाठी, मला कांही कळतच नाहीं त्यांचं ! इथली मंडळी म्हणे त्याना पसंत नाहींत ! म्हणजे, ह्या तिघांबद्दल त्यांचं मन निर्मळ नाहीं, हें उघडच नाहीं का? तसंच, मी खचित सांगते, ते तिघे आपणाला बरोबरीचा समजत नाहींत—त्यांच्या

अभिरुचीप्रमाणं आपण नाही, असेही ह्यांना वाटत असलं पाहि
खरंच, मला तर बाई लाज वाटते ह्यांचा अवतार पाहून—कुणीकडे
कॉलर, काय तो गबाळेपणा ! मी म्हणतें, तूं त्यांना एकदां सांगून पाहा
जरा नीटनेटकेपणानं राहायला ! निदान सायंकाळी तरी ठाकठीक असत
म्हणावं ! तुझ्या सांगण्यानं ते ऐकतात ! आज सकाळचीच गोष्ट पाहा,
तो तमाशा ? एव्हढा थोरला तो ऑफिसर, ' काडी लावूं का ' म्हणून र
म्हणायला गेला, तर त्याच्यावर काय कडाडले ! मला तर अगदीं मेल्य
मेल्यासारखं झालं ! असं वाटलं कीं आतां धरणी दुभंगून मी त्यांत
झाले तरी चालेल ! "

" खरच, आई, काय ग झालं त्यांना इतकं कडकडायला ? केव्हाप
तुला मी ' विचारीन, विचारीन ' म्हणून म्हणत होते. असं नव्हतं
बाबांना इतकं चवताळतांना मी पूर्वी कधी पाहिलं ! माझं तर धाव दण
गेलं अगदी ! "

" तसं कांहीं नाही ग ! डोक्यांत राख घालून घ्यायची एक लहर, झ
मला वाटतं, हुंडणावळीचा भाव अंगाशीं आला असेल ! पण कदाचि
आपण इंग्रजीत गप्पा मारीत होतो ना, म्हणून बिथरले असतील ! ह
लोक मजा मारताहेत, आनंदांत आहेत, असं बघितलं की ह्यांचं पित्त
कतं ! तुझी नसेल नजर गेली, पण मीं पाहिलं होतं; आपलं नृत्य चा
असतांना हे कसे डोळे फाडफाडून आपणाकडे बघत होते । झाडाआड ल
बसणाऱ्या खुनी माणसाप्रमाणं दारांत उभे होते; वाटच पाहात होते के
संधी सांपडते म्हणून ! म्हणे ' चालूं लागायचं ! आत्तांच्या आत्तां नि
यचं ! ' का ? तर केवळ ह्यांची तब्येत लागत नाही म्हणून ! आपलं मन
रमत नाहीं, म्हणून दुसऱ्यांना का सुख भोगून देऊं नये ह्यांनीं ? तें त

नाही; मी नाही एवढी तकलीफ करून घेणार ह्याच्या लहरीसाठी ! मग, कांही का हे म्हणेनात अन् करीनात ! ''

अशा रीतीनें त्या माय–लेकींचें बोलणें झालें; कपडेहि बदलून झाले. सज्जाकडील दाराच्या उघड–झांपीचा आवाज त्याच्या कानी आला दिवा मालवायचे बटणही वाजले

तो अगदी निश्चल पडून राहिला होता. शब्द न् शब्द त्याला ऐकूं आला, पण चलबिचल मुळीच झाली नाही त्याच्या मनात ! क्रोधाची भट्टी विझून थडगार पडल्यासारखी दिसत होती. शान्तचित्तानें तो उठून उभा राहिला; आणि सावकाश व सावधपणानें जिना उतरून, भोजनगृहात त्यांच्या मेजाशी अगदी अनोळखी गृहस्थाप्रमाणें जाऊन बसला.

* * *

त्या संध्याकाळी तो कुणाशीच एक शब्द देखील बोलला नाही; तसेच त्या दोघींचेही त्याच्याकडे लक्ष गेले नाही. थंडीनें गारठलेल्या मुठीसारखी त्यानें जी स्तब्धता धारण केली होती ती त्या दोघींपैकी एकीच्याही लक्षांत आली नाही. शिरस्त्याप्रमाणे, ' शुभरजनी ' देखील न म्हणतां, तिथून मुकाट्यानें उठून तो वर आपल्या खोलीत आला आणि दिव्याला निरोप देऊन बिछान्यावर कलंडला. मागाहून कितीतरी वेळाने त्याची बायको वर आली. मनसोक्त गप्पागोष्टी मारून झाल्या असल्यामुळें ती खुषींत होती. त्याला झोप लागली असावी अशा कल्पनेनें, अधारांतच तिनें आपला जामा–निमा उतरून ठेवला. लवकरच, तिचे लयबद्ध श्वासोच्छ्वास ऐकूं येऊं लागले; त्यांवरून त्यानें ताडले की तिला झोपही लागली !

अशा रीतीनें, पुन्हां एकाकी स्थितीत, रात्रीच्या अफाट पोकळींत तो डोळे वटारून पाहात राहिला. अंधारांत शेजारीं कोणीतरी आहे – कोणी तरी

घोरत आहे – कोण बरं ती व्यक्ति ? एकेकाळीं, नव्हाळीनें नटलेली, नवतीनें रसरसलेली जी तनुलतिका आपल्या पूर्ण परिचयाची होती, तारुण्यसुलभ शरीरधर्माच्या निगूढ आकर्षणानें जिच्याशीं आपण निगडित झालों, जिच्या संगतींत – एकाच शय्येवर परस्परांच्या श्वासोच्छ्वासांनीं समृद्ध झालेल्या हवेत आपण एकरूप झालों ती हीच तन्वंगी; जिच्या उदरीं आपल्या कन्येचा जन्म झाला ती हीच देहमंजुषा; जरा हात लांब करू तर जिच्या सुखोष्ण मृदुल कायेचा आपल्याला सहज स्पर्श घडेल ती हीच आपली सहचारिणी; ती हीच एके काळची आपल्या जीविताची साक्षात् भागीदारीण;–अशी परोपरीच्या आठवणींनीं आपल्या मनाची समजूत घालण्याचा त्यानें प्रयत्न केला, तरीही त्याचें मन वळेना ! आणि त्यातही आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्मृतीला उजळा देऊनही त्याच्या अंतरांत कसलीच भावना जागृत होईना. सरोवरावर उठणाऱ्या जललहरी किनाऱ्यावर येऊन आदळतांना जो एकसारखा मर्मरध्वनि निनादत होता तो जितक्या निर्लेप मनानें तो ऐकत होता, तितक्याच निर्विकार मनानें, आपल्या निद्रित बायकोचेही श्वासोच्छ्वास ऐकत होता. एका इतकीच दुसऱ्याबद्दलही त्याला अवश्यकता किंवा जवळीक वाटेना. त्याच्या अस्तित्वात बायकोला कांही स्थानच आतां उरले नव्हतें.

फिरून चोरटी चाहूल कानी आल्यामुळें तो चमकला. आरुणीच्या निजायच्या खोलीचं दार हलकेच उघडले गेल्याचा आवाज त्याच्या कानीं आला.

" पुन्हां आज रात्रीं ! "

ह्या विचारानें त्याच्या हृदयांत – जे पार मेले आहे असें त्याला वाटत होतें, त्यांत कट्यारीनें भोसकल्यासारखें झाले. अजुन धुगधुगी आहे म्हणायची ! बाकी, मरायच्या पंथाला लागलेलेंच आहे; पण अखेरचा क्षण अजून येऊन ठेपलेला नाहीं, इतकेच !

अल्पावकाशांतच, ती उठलेली तिडिक थांबली.

" कांही कां करीना ती ? काय करायचं आपल्याला ? "

ह्या विचारानें, मनावरचा ताण कमी होऊन, तो परत स्वस्थ पडून राहिला. घनांधकाराच्या गारढोण आवरणांत त्याच्या सर्व संवेदना विराम पावल्या. लवकरच त्याला डुकली लागली.

# ८

सकाळी बायको जेव्हा जागी झाली तेव्हा, सोमनाथानें कपडे पेहरून ओव्हरकोटही चढवलेला तिला दिसून आला.

" कसली तयारी चाललीय ? बाहेर का जाणार ? अन् इतक्या लवकर ? " निदसुऱ्या आवाजांत तिनें विचारपूस केली.

तिच्याकडे वळून देखील न पाहतां, त्यानें आपली बॅग भरण्याचा उद्योग पुढे चालूं ठेवला.

" विसरलीस वाटतं ? मला परत गेल पाहिजे ! – फक्त जरूर तेवढंच मी माझं सामान आज बरोबर घेत आहे. बाकीचं मागाहून दे पाठवून कधीं तरी. "

तिला एकदम भीति वाटली. ' काय, झालंय तरी काय ह्यांना ? ' इतके खडखडीत, इतके निश्चयी स्वरानें, इतके निर्लेपपणानें त्याला बोलतांना तिनें पूर्वी कधीच ऐकले नव्हतें. ती घाबरली, अन् ताडकन् उठून बसली.

" असं एकट्यानंच नाही जायचं ! थोडे थांबा, आम्ही देखील येतों तुमच्याबरोबर आरुणीलाही मी सांगून ठेवलं आहे. "

त्यानें नकारार्थी मान हालवली.

" नको, कांही नको; इतकी तसदी घ्यायला नको ! "

मागे वळून न पाहतांच त्यानें दार गाठले दाराची कडी काढण्यासाठी, त्याला हातांतली बॅग जरा खाली ठेवावी लागली. तत्क्षणी अनेक आठवणी त्याच्या मनोकाशांत घुमू लागल्या. पूर्वी आपण फिरते एजंट होतो त्यावेळी परक्याच्या खोलीतून बाहेर पडतांना, आदबीनें मान लववून, पुढें मिळणाऱ्या ऑर्डरीच्या अपेक्षेनें आशाळभूत मुद्रा करून, किती शेकडों हजारों वेळां आपणाला आपल्या हातांतली मालाच्या नमुन्याची पेटी अशीच, दार उघडताना, खालीं ठेवावी लागली आहे. पण आज तशा प्रकारचा सवदा करायचा नव्हता; म्हणून तसा आदबशीरपणा दाखवायचीही आवश्यकता नव्हती. निरोप घेण्यासाठी एक शब्दही न उच्चारता, कसलाही हावभाव न करतां, आपली बॅग उचलून तो दारांतून बाहेर आला; आणि मागल्या मागे दार लोटून दिलें;—जणुं कांहीं एथवरच्या आपल्या आयुष्याचेंच दार त्यानें बंद केले.

* * *

हे एवढे स्थित्यंतर कसे घडून आले, ह्याची मायलेकींना कांहींच कल्पना येईना. त्याच्या तुटकपणानें आणि निर्धारपूर्वक प्रयाणानें त्या दोघीजणी अस्वस्थ झाल्या. त्यांनीं तत्परतेनें त्याला पत्रें पाठविली. पाठविलेल्या

पत्रांत त्यांनीं होतां होईल तो जिव्हाळ्याची भाषा वापरली होती. प्रवासांत कांहीं त्रास झाला नाहीं ना ? सुखरूप पोहोचलाच असाल ? वगैरे समाचार त्यांनीं मोठ्या उत्कंठेनें विचारला होता. 'तुम्ही म्हणाल तेव्हां परतायची आमची तयारी आहे' हाही त्यांनी खुलासा केला होता. परंतु त्याच्याकडून एकाही पत्राला उत्तर आले नाही. म्हणून अधिक अगत्यानें आणि अधीरतेनें त्या मायलेकींनी फिरून निकडीचीं पत्रें टाकलीं; शेवटी तारसुद्धां केली; तरीदेखील उत्तर नाही. नंतर, एकदां एका पत्रीं त्यानी जेव्हां पैसे पाठविण्याबद्दल लिहिलें तेव्हां मात्र, मागितल्या रकमेची पोस्टल ऑर्डर ( टंकलिखित पत्ता असलेल्या पाकीटांतून ) अगदी उलट डाकेनें आली. परंतु खाजगी मजकुराचे चिटोरे देखील त्यांत नव्हतें.

बुचकळ्यांत टाकण्याजोग्या हा त्याच्या वागणुकीचा परिणाम मात्र असा झाला की त्या दोघीजणी तांतडीनें स्वगृहीं परत आल्या. आपण कोणत्या दिवशीं कोणत्या गाडीनें येत आहोत तें त्यांनीं आगाऊ वेळेवर कळविलें होतें. पण त्यांना उतरून घ्यायला स्टेशनवर कोणीच आले नाही. आणि घरी येऊन दाखल झाल्यावर, आपण येणार असल्याबद्दल कांहींच पूर्वतयारी नसल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. "धनीसाहेबांनीं, आम्हांला कांहीच न सांगतां सवरतां, इथं टेबलावर तार ठेवून दिली" असे चाकरांनीं सांगितले. संध्याकाळी, जेवायसाठीं त्या तयार झाल्या त्यावेळीं त्यांनी पुढला दरवाजा वाजलेला ऐकला. घाईघाईनें उठून त्या दिवाणखान्याकडे जवळजवळ धांवतच गेल्या. तो वृद्ध घरधनी त्यांच्याकडे विस्मयचकित नजरेनें पाहूं लागला. तारेचा त्याला पार विसर पडलेला असावा, हे स्पष्ट दिसत होतें. त्याच्या कन्येनें त्याला मिठी मारली; त्यानें तिला हरकत केली नाही, पण त्याच्या चेहऱ्यावर कांहींच भाव दिसून आला नाहीं त्या दोघींबरोबर तो जेवणघरांत गेला. त्यांनीं आपल्या गमती सांगायला सुरुवात केली. वृद्ध

गृहस्थानें जिज्ञासा दाखविली नाहीं. सिगारेटचे झुरके घेत तो शान्तपणे बसून राहिला; हां–हूं पलीकडे कसलेंच उत्तर दिलें नाहीं. किंबहुना, त्या काय सांगत होत्या याकडे त्याचे लक्षसुद्धां नसावें. झोपेंत व्यवहार करणाऱ्या मनुष्यासारखी त्याची गत झाली होती. कांहीं वेळानें, जडपणानें उठून, तो आपल्या खोलीकडे चालता झाला.

कित्येक दिवस सर्व व्यवहार ह्याच पद्धतीनें चालले होते. त्यामुळें बायकोचे चित्त फारच व्यग्र झाले. सर्व गोष्टींचा उलगडा करून घेण्याचा तिनें प्रयत्न केला; पण व्यर्थ! तिनें जो जों हिरीरीनें त्याला छेडावें तों तो अधिक ताठरपणानें तो घुमेपणा धारण करूं लागला. कड्या-कुलुपानें व आडसरानें दरवाजाचा पक्का बंदोबस्त केला गेला. कांहीच दाद लागेना! सर्व वाटा चुनेगच्ची भिंतीनीं बंद करण्यांत आल्या. त्यांच्या पंगतीला बसून जेवणाचा परिपाठ त्यानें चालूं ठेवला. पण पंगतीला पाहुणे असले तरी तो आपल्याच विचारांत गढून राही. कौटुंबिक जीवनांत तो कांहींच भाग घेईनासा झाला. घरीं गांठीभेटीला येणारांनाही असाच कटु अनुभव येऊं लागला. बोलण्याच्या ओघांत, कोणी त्याच्या नजरेला नजर दिली तर त्याला असे दिसून येई की सोमनाथाची नजर, समोर कोणी नसल्यागत, आपल्याही आरपार कुणीकडे तरी लागून राहिली आहे.

अगदी किरकोळ मामुली परिचयांतल्या मंडळीना देखील त्याचा वाढता तऱ्हेवाईकपणा समजून आल्याशिवाय राहिला नाहीं. त्याची मित्रमंडळी, रस्त्यांत त्याची गांठ पडतांच, एकमेकांना कोपरखळ्यांनीं त्याची ती अवस्था पुचवूं लागले. सोमनाथ शहरांतील अत्यंत सधन गृहस्थांत मोडत होता. परंतु एखाद्या भिक्षेकऱ्याप्रमाणें तो रस्त्याच्या कडेकडेनें भिंतीशी खेटून जाऊं लागला. तंबाखूच्या राखेनें ढगाळलेला कोट आणि वेडीवांकडी बेडौल टोपी ह्यांनीं त्याच्या दरिद्री वेशांत भरच पडली. चालतांना त्याचा तोल जाई

आणि तो स्वतःशींच पुटपुटत असे. कोणी त्याला अभिवादन केले तर तो भेकरासारखा भलतीकडेच बघूं लागे आणि त्याच्याशीं कोणी बोलण्याचा प्रयत्न केला तर, त्या बोलूं इच्छिणाराशी हस्तांदोलन सुद्धा न करता, भकास नजरेनें त्याच्याकडे नुसताच पाहात राही. प्रथम प्रथम लोक ह्याला ऐकायला कमी येऊं लागले असावें असा ग्रह करून घेऊन, तेच ते शब्द पुन्हां पुन्हा मोठ्यानें उच्चारीत. पण खरी अडचण ही होती की, आपल्या विचाराच्या तंद्रींतून त्याला जाग यायला उशीर लागे. आणि, अशा रीतीने सावध होऊन जरी तो बोलूं लागला तरी फिरून चटदिशी त्याची सावधानता नष्ट होई. असे झाले म्हणजे त्याच्या डोळ्यातले तेज लुप्त होई. आणि मग वळून, आपल्या वाटेने चाचपडत चालूं लागे. आपण ज्याच्याशी बोलत होतों तो ह्या वागण्याचे आश्चर्य करीत असेल, ह्याची अर्थातच त्याला जाणीव कशी असणार? तो सर्वस्वी आत्मस्थितीत विलीन झाला होता; स्वतःखेरीज इतर मानव-सृष्टी त्याच्या हिशेबी नष्टप्राय झाली होती. कुणाच्याही क्षेमसमाचाराची त्यानें चौकशी केली नाही. घरांत, कन्येची गोंधळलेली अवस्था किंवा बायकोचे नैराश्य, हेंही त्याच्या लक्षांत येईना. वर्तमानपत्रें वाचायचें त्यानें सोडून दिले आणि लोक काय बोलतात तेंही ऐकून घेण्याची त्याला इच्छा उरली नाहीं. कोणतीही बाह्योपाधि किंवा विचार त्याच्या भीषण विमनस्कतेचा कोट फोडून आत तात्पुरताही शिरकाव करून घेण्यास समर्थ होईना. त्याच्या वैयक्तिक अस्तित्वाचे जे मध्यवर्ती केंद्र म्हणून समजले जाई त्याच्यापासूनही तो दूरावत चालला. तो थोडा वेळ ऑफिसला जाई आणि आपल्या खुर्चीवर बसून राही,—सह्यांसाठीं कागदपत्रांची वाट पाहतो आहे असें वरकरणी वाटे. पण व्हायला काय लागले, त्याच्या चिटणिसानें सह्यांसाठीं पत्रांची रास त्याच्यापुढें ठेवून जावें आणि तासाभरानें ती घेऊन जाण्यासाठी परत यावे, तो

त्याला असें आढळून येई की, त्यातला एकही कागद न वाचता सोमनाथ कुठे तरी शून्य नजरेनें नुसता पाहात बसला आहे. अखेर, सोमनाथाच्याच ध्यानात आले की आपले ऑफिसला येणेही फुझुल आहे. अर्थात्, मग त्यानें ऑफिस सर्वस्वीच वर्ज्य केले.

इतर सर्व गोष्टीपेक्षा, सगळा गांव जर कशाबद्दल आश्चर्य करूं लागला असेल तर तो ह्याबद्दल. ज्या सोमनाथाची देवधर्मा–बाबतीतल्या कडकडीत आचरणाबद्दल मुळींच ख्याती नव्हती तोच आता पक्का कर्मठ बनला. जरी बाकीच्या सर्व बाबतींत त्यानें बेफिकीरपणा धारण केला होता, जरी ठर-लेल्या गांठीभेटी तो खुशाल टाळू लागला होता आणि जेवायच्या वेळेचे सुद्धा जरी त्याला भान राहीनासे झाले होतें तरी तो प्रार्थनामंदिरात मात्र बिन-चुक वेळेवर हजर राहण्यांत यत्किंचितही हयगय करीनासा झाला. काळी भोर कफनी आणि काळी रेशमी टोपी घालून, तो, आपले वडील ज्या जागी उभे राहत असत त्याच जागीं नेमका उभा राहून, प्रार्थना–गीताच्या ताला-वर डोलूं लागला. अधुनमधून तुरळक लोक ज्या ठिकाणी जमा होत असत अशा त्या मंदिरांत, अपरिचित शब्दांचा गंभीर गुंजारव कानावर आदळत असताना, निखालस एकान्ताचा त्याला लाभ होई. त्याच्या अंतरांत नेहमीं जो समूढतेचा गोधळ माजून राहिलेला असे, त्याचा आता निरास होऊन, तिथें एक प्रकारच्या शांततेचे साम्राज्य नांदूं लागलें. जेव्हां मृताबद्दल तिथे प्रार्थना होत, दिवंगताचे आप्तेष्ट व स्नेहीसोबती, आपले एक शोक–कर्तव्य म्हणून, त्याच्या आत्म्याला शांतता लाभावी एतदर्थ जेव्हा मस्तक विनम्र करून परमेश्वराची करुणा भाकीत तेव्हा सोमनाथाचे डोळे आसवांनीं अंध होत असत. ( हीं आसवे काय सागतात ? ) त्याच्या कुळांत तो शेवटचा पुरुष. ‘ आपण दिवंगत झाल्यावर आपल्या नांवानें तर्पण करायला ( क्रिया-

कर्म करायला ) मागे कोण आहे ? ' ह्या विचाराने, आपण आतां मृतच आहोंत असें कल्पून, तो स्वताचेच श्राद्धकर्म उरकून घेत असावा !

एके दिवशी सायंकाळीं, बऱ्याच उशीरानें, सोमनाथ निरुद्देश भटकून घराकडे परत येत असतांना जोरांत पाऊस येऊं लागला. नेहमीप्रमाणे, छत्री घ्यायला तो विसरला होता. थोडेंसेंच जायचे असले तरी त्याला गाडी करतां आली असती, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या त्याचप्रमाणें घरांपुढल्या कमानी किंवा वळचणी यांच्याही आसऱ्याला जातां आलें असतें परंतु गैरसावधपणानें तो सरळ रस्त्यामधून कोसळणाऱ्या पावसांतून भिजत चालला होता. त्याच्या मोडक्या टोपीच्या कटोऱ्यांत पाणी सांठले. भिजून-चिंब झालेल्या आस्तन्यांतून पाण्याच्या धारा गळत होत्या. तशाच स्थितीत तो आपली वाट कापीत राहिला. हा एकटा पादचारी सोडला तर सर्व रस्ताभर संपूर्ण शुकशुकाट होता. आंत अंगापर्यंत सचैल न्हाऊन निघालेला तो गृहस्थ—एका टोलेजंग बंगल्याचा मालक खरा, पण त्या बंगल्याच्या दारापाशी येऊन दाखल झाला तो एखाद्या कंगाल भणंगासारखा !

त्याच क्षणी, एक झगझगीत उजेडाची मोटर त्याच्यावर चिखल–पाण्याच्या चिळकांडया उडवीत तिथेच येऊन थडकली. मोटारीचें दार उघडले. तिच्या अंतर्भागी बत्ती लागली. त्या उजेडांतून एक सभ्य गृहस्थ लगबगीनें खालीं उतरला; आणि मागोमाग दुसऱ्या सद्‌गृहस्थासमवेत उतरणाऱ्या युवतीला पाऊस लागूं नये म्हणून त्यानें तिच्यावर छत्री धरली. ती सोमनाथाची बायको होती. अशा वेशांत आणि नेमका ह्याचवेळीं आपला पती समोर पाहून ती मनांत चरकली आणि तिनें अभावितपणे आपली नजर दुसरी-कडे वळवली. सारा प्रकार सोमनाथाच्या तात्काळ लक्षांत आला. शिष्ट पाहु-ण्यांच्या संगतीत असतांना तिला आपल्या नवऱ्याची शरम वाटली. स्वस्थ चित्तानें, कडवटपणाची चेहऱ्यावर मुळींच छटा न दाखवतां, त्यानें

असा विचार केला कीं, " पाहुण्यांना आपला परिचय करून देण्याच्या अडचणीत तिला कशाला घाला ? त्यापेक्षां, तिच्या वाटेंतून आपणच दूर झालेलें काय वाईट ? " चार पावलें बाजूला जाऊन, नोकर—चाकरांसाठी जो स्वतंत्र दरवाजा होता त्याच्या पायऱ्या चढून, दीनवाण्यासारखा तो तिकडून घरांत गेला.

तेव्हांपासून तो चाकरलोकांच्या दारानेंच ये—जा करू लागला. कारण, त्या बाजूला बायकोचा मित्रपरिवार भेटण्याचा बिलकुल संभव नव्हता. त्या बाजूला त्याचा कोणाला उपसर्ग पोहोचेना किंवा त्याला दुसऱ्या कोणाचा उपद्रव होईना. जेवणघरांत जाण्याचेंही त्यानें आतां बंद केलें. घरकामाला असलेली एक पोक्त बाई त्याचें ताट त्याला खोलींत आणून ठेवूं लागली. त्याची बायको व आरुणी ह्या दोघींनीं त्याच्याच खोलीत त्याची पंगत साधायचा प्रयत्न करून पाहिला; पण त्यायोगानें त्याच्या अभेद्य उदासीनतेंत बुजरेपणाची अधिकच भर पडे. त्यामुळें त्यांना तो नाद सोडून द्यावा लागला. शेवटी, तो जसा कुणाचीच आणि कशाचीच पर्वा करीत नाहीं, त्याप्रमाणे, आपणही त्याची पर्वा करूं नये, त्याचें त्याला काय करायचें तसे करूं दे, अशा विचारानें त्या मायलेकींनीं त्याच्या वाटेला जायचें नाही असा निर्धार केला. घरांतील इतर खोल्याकडे तो फिरकेनासा झाला. त्या खोल्यांतील हसणे-खिदळणे व गाणें—बजावणे त्याला भिंतींतून ऐकूं येई. परंतु त्याच्या विमनस्कतेची मजल इतक्या थराला गेली होती की, एकदां देखील त्यानें खिडकींतून बाहेर डोकावून पाहिले नाही. त्यांच्या येण्या-जाण्याशीं, त्या वर्दळीशीं काय कर्तव्य होतं त्याला ?

फक्त घरांतला कुत्रा मात्र वेळोवेळीं वर येई आणि सर्वांच्या स्मरणांतून गेलेल्या घरधन्याच्या बिछान्यावर मान टाकून पडून राही.

# ९

त्या जीवन्–मृताच्या अंतःकरणांत आता अधिक यातना सोसायचे त्राण नव्हतें. परंतु ( घराला लागलेल्या घुशीप्रमाणे ) ती व्याधी त्याचे शरीर पोखरीत चालली होती. आठवड्या–आठवड्याला झटक्यांची वाढ होऊं लागली. आणि अखेर, नीट निदान करायसाठीं शस्त्रक्रिया करून पाहावी असे जेव्हां डॉक्टरांनीं सुचविलें तेव्हां त्यानें कां – कूं केले नाही. 'शस्त्र-क्रिया' म्हटलें कीं तो कच खाईल, तेव्हां त्याला धीर द्यावा म्हणून, तज्ज्ञ चिकित्सकांनीं ( मामुली डॉक्टरांच्या अभिप्रायाला ) आपल्या मताची अशी पुस्ती जोडली की 'कदाचित्' आतां शस्त्रक्रियेइतकी व्याधी परिपक्वच

झाली असावी. सोमनाथाला मुळांतच भय वाटलें नव्हतें, अर्थात् तज्ज्ञांची मल्लिनाथी ऐकून तो नुसता हसला.

"अंतकाळ जवळ आला, हीच देवाची कृपा! मरतांना रेंगाळायला नको! मरणानेच चटपट निकाल लागेल! मृत्यूच विराम सकलापदाम्! तोच आता तर हाताच्या अंतरावर आला आहे."

आपली बायको किंवा आरुणी ह्यांना ह्या निर्णयाची मुळींच कल्पना न देण्याबद्दल त्याने डॉक्टरांना निक्षून बजावले, शस्त्रक्रियेचा दिवस मुक्रर केला आणि सर्व पूर्वतयारी केली. कचेरीकडे एक अखेरची फेरी टाकली. कुणाचीच अपेक्षा नव्हती तो येईल म्हणून. सगळे लोक त्याच्याकडे परक्या-प्रमाणे बघत राहिले. गेली तीस वर्षें त्यानें जी एकच एक कातडी गादीची खुर्ची वापरली होती तिच्यावर फिरून एकदा त्याने बसून घेतले. एक चेक लिहून, तो प्रार्थना–मंदिराच्या मुख्य पाद्र्याकडे घेऊन गेला. चेकवरचा आकडा पाहून पाद्री आश्चर्यचकितच झाला. आपला अंत्यविधी व थडगे ह्यासाठी जरूर ती तरतूद करून, बाकीची सर्व संपत्ति अनाथ–अपंगांच्या सस्था व दानधर्म ह्या कारणी लावावी अशी सोमनाथानें योजना केली होती. ह्या औदार्याबद्दल आभारांचा वर्षाव होईल, तो टाळण्यासाठी त्यानें घाईघाईने तिथून पाय काढता घेतला धांदलीत वाटेत आडखळल्यामुळे त्याची टोपी पडली; पण ती उचलून घेण्याचीही त्याने दखलगिरी घेतली नाही. बोडका, खिन्नलोचन, आणि पिवळसर चेहरा – अशी ती मूर्ति वडि-लांच्या थडग्याचे दर्शन घेण्यासाठी दफन भूमीकडे वळली. कांही रिकाम-टेकडे त्याच्याकडे कुतूहलानें पाहात राहिले. ती थडगीं म्हणजे साक्षात् जिवंत माणसेच होत, अशा भावनेनें, त्यांच्यापुढें गुडघे टेकून, तो कांही तरी पुटपुटूं लागला. त्यांना तो केवळ अभिवादन करीत होता की त्याच्या आशीर्वादांची याचना करीत होता? कोणालाच त्याचे शब्द ऐकूं

आले नाहींत. पण त्याचे विनम्र मस्तक आणि हालणारे ओठ मात्र दिसून आले. कबरस्तानाच्या दरवाजापाशीं जमलेल्या भिकाऱ्यांनीं त्याच्या भोंवती एकच गर्दी केली. कारण; त्या सर्वांना त्याचें दातृत्व आतां चांगले माहीत झाले होतें. खिशांत होती नव्हती ती चिल्लर व नोटा ह्यांची त्यानें खैरात करून टाकली. इतक्यांत, एक जख्ख थेरडी, कडमडत त्याच्या समोर येऊन, भिक्षेसाठीं हात पसरून गयावया करूं लागली. त्यानें फिरून आपले खिसे धुंडाळले – उपडे करून पाहिले. पण हातीं कांहींच लागले नाही. इतक्यांत, जड व टणक वस्तूनें वेढलेल्या हाताच्या बोटाकडे त्याचें लक्ष गेले. लगेच, एक विचार आला. ती लग्नांतली आंगठी त्यानें बोटांतून काढून घेतली आणि त्या म्हाताऱ्या भिकारणीला दान देऊन टाकली. अशा रीतीनें सर्व वैयक्तिक मालमत्ता व चीजवस्त ह्यांचा परित्याग करून, सर्वथैव एकाकी व विदेही स्थितींत, आपल्या पायानें चालत जाऊन, तो डॉक्टरी सुरीखालीं आडवा झाला.

* * *

भूल उतरून तो ज्यावेळी सावध होऊं लागला, त्यावेळी, त्याची स्थिति कांहीं ठीक नाही असे डॉक्टरांना कळून चुकले. म्हणून त्यानी त्याच्या बायकोला व कन्येला बोलावून घेतलें.

"मी कुठें आहे ?" त्यानें विचारले. पांढऱ्या शुभ्र भिंतीकडे त्याची नजर लागली होती.

जिव्हाळ्याच्या उत्कटतेनें आरुणी त्याच्याकडे वाकून पाहूं लागली. ओळख पटल्याची चमक त्याच्या डोळ्यांत तरळली. 'ही आपली एकुलती एक लाडकी कन्या!' त्याच्या ओठांच्या हालचालीनें प्रेमळ हास्याच्या रेषा जिवणीच्या आंवतीभोंवती उमटूं लागल्या. गेले कित्येक दिवस जो भाव

पित्याच्या मुद्रेवरून लुप्त झाला होता त्याचें पुसट लक्षण प्रगट होत असलेलें पाहून आनंदातिशयानें ती गादीवरून गेली व त्याच्या गालाचें चुंबन घेण्यासाठीं खालीं वाकली ! इतक्यांत—

बापलेकीची प्रथम फारकत झाली त्यावेळची त्याला त्यावेळीं काय कारणानें आठवण झाली, हें कोण सांगूं शकणार ? कदाचित् तिनें केसाला जें तेल लावलें होतें त्याच्या वासानें, त्याच्या बधिर व निश्चेष्ट मेंदूला जाग आली असावी. एकाएकीं त्याच्या मुद्रेंत भीषण फरक पडला. त्याचे फिकट ओठ तीव्र वैरभावानें आवळले गेले. पांघरुणांत त्याच्या हाताची चुळबुळ सुरू झाली. जणुं कांहीं बांधून घातलेला हात सोडवून घेऊन, कांहीं तरी तिरस्करणीय वस्तू दूर ढकलायची आहे, अशा अर्थाची ती चुळबुळ होती. त्याचें जखमी शरीर क्षोभानें थरथरूं लागलें.

" दूर– ! दूर– ! " जेमतेम एवढींच अक्षरें, पण अचुक ऐकूं आलीं. त्यांत कांहीं संदिग्धता नव्हती.

त्या आसन्नमरण मनुष्याची ती भयंकर वैरबुद्धि पाहून, डॉक्टरांनीं त्या दोघींना तिथून त्वरेनें बाहेर जाण्याची खूण केली.

" सोमनाथाला वात झाला आहे. तुम्ही जितक्या लवकर दृष्टीआड व्हाल तितकं बरं " असें ते कुजबुजले.

त्या दोघीजणी बाहेर जातांच, रागाचा भर ओसरून, त्याला झापड आली. थोडा वेळ त्याचा श्वासोच्छ्वास शांतपणें चालला.

पण मग लवकरच शेवटची घरघर सुरू झाली.

दुःखपूर्ण जीवनाचा श्वास ओढून घेण्याचें आतां त्याला बिलकूल त्राण उरलें नाहीं.

थोड्याच मिनिटांनीं त्या विच्छिन्न हृदयाची क्रिया बंद पडली

देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार,
पुणें २

मूल्य
२ रुपये

## पुढील प्रकाशनें

१ बुद्ध आणि हिटलर
*वि. स. खांडेकर*

२ प्रा. वा. म. जोशी चरित्र
*मा. म. पटवर्धन*

३ माझे आवडते कवि
*ग. त्र्यं. माडखोलकर*